वृषीवल

रायगड, सोमवार दि. २७ नोव्हेंबर २०२३

किंमत ४ ₹

बाप्पांची नगरी बॅनरबाजीमुळे विद्रुप

पान ३ वर

भारत-पाकिस्तान रंगणार क्रिकेटचा सामना

पान ८ वर

आजचा अग्रलेख
बोगद्यातील लढाई

राज्याला अवकाळीचा तडाखा

पुणे, सातारा, नगर, कोकणासह नाशिकमध्ये पाऊस

। पुणे । वृत्तसंस्था ।

राज्यातील पुणे, सातारा, नगर, कोकणासह नाशिक जिल्ह्याला रविवारी अवकाळी पावसाने झोडपून काढले. काही ठिकाणी गारपीट झाली, बहुतेक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली. अचानक पडलेल्या पावसाने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पुढील कालावधीत पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. रायगड जिल्ह्यातही ठिकठिकाणी पाऊस झाला असून त्यामुळे भात, सुपारी, पिकांचे तसेच वीटभट्ट्यांचे नुकसान झाले आहे.

शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील टाकळी हाजी, पाबळ, कवठे येमाई, सविंदणे, वडनेर खुर्द, फाकटे, चांडोह, निमगाव दुडे या परिसरातील गावांमध्ये दुपारी चार वाजण्याच्या सुमारास सोसाट्याचा वारा, ➤ पान २ वर

● अलिबाग तालुक्यात पावसाच्या तडाख्याने सुक्या मच्छीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

सुपारी भिजली, भाताचेही नुकसान

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

रविवारी पहाटे मुरूड तालुक्यात अचानक आलेल्या वादळामुळे मच्छिमार आणि बागायतदारांची भंबेरी उडाली. अनेकजण भयभीत झाले.

ढगांचा गडगडाट व विजेच्या लखलखाटात आलेल्या पावसाने नुकतीच मुरूड, आगरदांडा, नांदगाव, शिघ्रे परिसरातील झाडावरुन पक्व झाल्यामुळे पाडून वाळण्यासाठी घातलेली सुपारी भिजल्याने सुपारी बागायतदारांचे मोठे नुकसान झाले आहे.शनिवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरणाने हवेतील उष्मा वाढला होता. रात्री दोन वाजल्यापासून ढगांचा गडगडाट व विजेच्या चमचमाट सुरू झाला. पहाटे चार वाजल्यापासून पावसाची

■ मुरुडमध्ये बागायतदार चिंतेत

रिपरिप सुरू झाली. ती सकाळी सहापर्यंत सुरू होती. या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतात रचून ठेवलेल्या उडव्या-मळण्या भिजल्या असून, पाऊस बंद न झाल्यास त्यातील भाताला मोड येऊन ते वाया जाण्याची शक्यता येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. तशीच सुपारीचीही अवस्था असून, पावसाने सुपारी फळांची वरील टरफले भिजल्याने आतील रोठा खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे सुपारी बागायतदार व शेतकरी चिंताक्रांत झाले आहेत.

वीटभट्ट्या झाल्या उद्ध्वस्त

। पाताळगंगा । वार्ताहर ।

वातावरण बदलाचा फटका वीट व्यवसायापासून ते पालेभाज्या लागवड करीत असलेल्या शेतकऱ्यांनासुद्धा बसला आहे. पहाटे पाच वाजता अवकाळी पावसाने सुरुवात केल्यामुळे तयार केलेल्या कच्च्या विटा वाचविण्यासाठी व्यावसायिकांची तारांबळ उडाली. विटांचे नुकसान होऊ नये यासाठी कामगारांच्या मदतीने प्लास्टिक टाकण्यात आले. आतापर्यंत नोव्हेंबर महिन्यात दोन वेळा अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे वीट व्यावसायिकांचे नुकसान झाले. या पावसाने सर्वत्र गारावा निर्माण झाला असला तरी वीटभट्टी मालकांची तारांबळ उडाल्याचे चित्र खालापूर तालुक्यातील काही भागात पाहायला मिळाले. त्यामुळे व्यावसायिक चिंतेत आहेत.

(आणखी वृत्त पान २ वर)

आजचा अग्रलेख
बोगद्यातील लढाई

वे|ध|क

आरोग्यसेवकाचा हृदयविकाराने मृत्यू

नेरळ : कर्जत तालुक्यातील आरोग्यसेवकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे. चंद्रकांत आंबाजी वारगुडा असे मृताचे नाव आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

आंबिवली प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अंजप हे उपकेंद्र असून तेथे चंद्रकांत वारगुडा हे आरोग्यसेवक म्हणून कार्यरत होते. २५ नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वाबारा वाजता वारगुडा हे आपले सहकारी आरोग्य सेवक ज्ञानेश्वर पारधी आणि मोहन तिवरे यांच्यासोबत पाणी तपासणीसाठी अंजप येथील बोरिवली ग्रामपंचायतमधील सराईवाडी येथे जाण्यासाठी निघाले होते. ➤ पान २ वर

भाजप लोकसभेच्या २६ जागा लढणार

मुंबई : लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचे जागावाटप जवळपास निश्चित झाले आहे. भाजपा २६, तर शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) २२ जागा लढविणार आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या मुलाखतीत दिली. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार काम करत आहे. नेतृत्वात बदल होणार असल्याचे वृत्त खोटे आहे. तसेच, मी लोकसभा निवडणूक लढवणार नाही. नागपूर येथील पारंपरिक विधानसभा म तदारसंघातून निवडणूक लढणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात ➤ पान २ वर

पनवेल परिसराला भूकंपाचे धक्के

पनवेल : सौम्य भूकंपाच्या धक्क्याने रविवारी पनवेल परिसर हादरला. मुंबईपासून १५ किलोमीटर अंतरावरील समुद्रात किनारपट्टीत रविवारी सकाळी नऊ वाजून पन्नास मिनीटांनी काही सेकंदांसाठी भूकंपाचे धक्के जाणवले. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार हा धक्का २.९ रिश्टर स्केलचा होता. या धक्क्याचा परिणाम नवी मुंबई आणि पनवेल परिसराला देखील जाणवला. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. सुरुवातीला स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांमध्ये देखील याबाबत संभ्रम असल्याचे पाहायला मिळाले. मात्र जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांच्याशी याबाबत सपर्क साधला असता त्यांनी या वृत्ताला दुजारा दिला. नवी मुंबई लगतच्या समुद्रातील भूगर्भात १५ किलोमीटरच्या आत २.९ रिश्टर स्केलचा भूकंप झाला असल्याची माहिती दिली.

त्रिपुरारीनिमित्त रोषणाईने उजळले रामेश्वर...

● (छायाचित्र : सुधीर नाझरे)



काशीद समुद्रात पर्यटकांचा बुडून मृत्यू

। आगरदांडा । वार्ताहर ।

काशीद समुद्रात पुणे येथून आलेला पर्यटकाचा बुडून मृत्यू झाला. ही घटना रविवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. दोन आठवड्यातील ही दुसरी घटना घडल्याने पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मुद्दसर इम्तियाज शेख (वय ३७) असे मृत पर्यटकाचे नाव आहे.

पुणे येथून १६ जणांचा समूह काशीद येथे पर्यटनासाठी शनिवारी आला होता. काशीद येथे वस्ती केल्यानंतर रविवारी सकाळी हे सर्व काशीद समुद्रकिनारी पर्यटनासाठी गेले. यातील काही जण पोहण्यासाठी पाण्यात उतरले. यातील इम्तियाज शेख (रा.पुणे-चिंचवड, रोनक रेसिडेन्सी) हे देखील होते. पाण्याचा अंदाज न आल्याने ते पाण्यात बुडाले.

दुचाकी अपघातात दोनजण जखमी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग - रेवस मार्गावरील खडताल पूलाजवळ दोन दुचाकींचा रविवारी सायंकाळी अपघात झाला. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. जितेंद्र वाघमारे (३९) रा. खोपोली व राजा राजपूत (२४) अशी या जखमींची नावे आहेत. दोघेही आपआपल्या दुचाकीवरून अलिबाग - रेवस मार्गावर प्रवास करीत होते. दरम्यान, सायंकाळी सव्वा आठ ते साडेआठ वाजण्याच्या सुमारास खडताळ पूलाजवळ दुचाकींची समोरासमोर ठोकर लागून हा अपघात झाला. जिल्हा सामान्य रुग्णालयात दोन्ही जखमींवर उपचार करण्यात येत आहेत.

कुणबी नोंदींना स्थगिती द्या : भुजबळ

। हिंगोली । वृत्तसंस्था ।

सारथी या मराठा समाजाच्या संस्थेला जे मिळाले ते ओबीसींनाही मिळावे, तसेच सापडलेल्या तीन कोटी कुणबी नोंदींना स्थगिती द्यावी, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी राज्य सरकारकडे केली.

हिंगोलीत रविवारी ओबीसींचा दुसरा मेळावा पार पडला. त्यावेळी भुजबळ बोलत होते. उपोषण करणाऱ्या नेत्यांसोबत फिरणाऱ्या ३-४ लोकांना पोलिसांनी पकडले आहे. पोलिसांनी तयार केलेले एफआयआर माझ्याकडे आहे. मराठा आरक्षणाला आमचा विरोध नाही, पण जाळपोळीसारख्या कृत्यांना माझा विरोध आहे, असे ते म्हणाले. गावबंदी करणाऱ्यांना तुरुंगात पाठवा अशी मागणी त्यांनी केली.

मराठा समाजाचे एकट्याचं सर्वेक्षण चालणार नाही. सर्वच जातींचे सर्वेक्षण करा. मराठा समाज मग इतरांपेक्षा मागास असेल तर त्यांना आरक्षण द्या. मंडल आयोगाने सांगितले आहे की आम्ही ५४ टक्के आहोत. सर्वच पक्षांचे नेते जातगणनेला अनुकूल आहेत. होऊन जाऊ द्या दूध का दूध, पानी का पानी, असेही ते म्हणाले. या मेळाव्याला काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार मात्र गैरहजर राहिले.

"आमची लायकी नाही तर आमच्या पंगतीत कशाला येताय"

आमची लायकी नाही, तर आमच्या पंगतीत कशाला येताय. यापुढे ओबीसींविरोधात बोललात, तर महाराष्ट्रात फिरणे बंद करु. आम्ही ४०० जातीचे ६० टक्के लोक आहोत. याची मनोज जरांगेंनी दखल घ्यावी, असे इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी दिला.

आम्हाला संविधानाने दिलेल्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी आम्ही संघर्ष करत आहोत. मंडल आयोगाच्या अहवालामध्ये मराठा समाजाला सुपर फॉरवर्ड कास्ट म्हटले आहे. आतापर्यंत सहा अहवाल प्रसिद्ध झाले, पण मराठा समाज मागास आहे, असे सिद्ध झाले नाही. त्यामुळे ओबीसींनी काय चोरलं हे मराठा आंदोलकांना सांगावे, असे आव्हान तायवाडे यांनी दिले. मनोज जरांगे ओबीसी, एसी, एसटी यांचा अपमान करत आहेत. जरांगे म्हणतात, ३२ लाख नोंदी सापडल्या म्हणजे ३२ लाख मराठे आता ओबीसीत आले. हे आपल्याला मूर्ख समजत आहेत. मात्र आम्ही आमच्या संविधानिक अधिकारांचे रक्षण करणार आहोत, असेही ते म्हणाले.

नवनिर्वाचित सरपंच, सदस्यांनी सजग रहावे

माजी आमदार पंडित पाटील

। आगरदांडा । वार्ताहर ।

लोकशाहीमध्ये मतदार हा सर्वोच्च आहे. त्यांनी केलेल्या मतदानामुळे लोकप्रतिनिधी निवडून येत असतात. या निवडणुकीत मुरुड तालुक्यात इंडिया आघाडीला चांगले यश प्राप्त झाले आहे. आगामी काळात आघाडी कायम रहाणार आहे. नवीन निवडून आलेल्या सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी अधिक सजग होऊन लोकांच्या समस्या सोडवण्यास प्रथम प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन माजी आमदार पंडित पाटील यांनी केले.

माजी आमदार पंडित पाटील यांच्या शिघ्रे येथील निवासस्थानी नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा संवाद मेळावा नुकताच आयोजित केला होता. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे मुरुड तालुका चिटणीस अजित कासार, अध्यक्ष तुकाराम पाटील, माजी सरपंच विजय गीदी, रमेश दिवेकर, राजपुरी सरपंच सुप्रिया गीदी, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपसरपंच इस्माईल सिद्दिक, माजी सरपंच लियाकत कासकर, महेश मापगावकर, ललित मढवी, नांदगाव ग्रामपंचायत उपसरपंच मेघा मापगावकर, वीरेंद्र देऊळकर, सुरेश मालवणकर आदी उपस्थित होते.

गाव स्वच्छ ठेवा, स्मशानभूमी स्वच्छ ठेवा त्याचबरोबर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डंपिंग ग्राउंडची उपाययोजना करा, असे आवाहन पाटील यांनी केले. ग्राम सेवकांवर अंकुश ठेवता आला पाहिजे. लोकांच्या ➤ पान २ वर

जिल्ह्यातील वातावरण पक्ष्यांसाठी झाले अनुकूल

विदेशी पाहुणे स्थिरावल्याने पक्षी निरीक्षक सुखावले

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

थंडीच्या हंगामात हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध देशी, विदेशी पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल होतात. अवकाळी पावसामुळे या पक्ष्यांची वाताहत झाली होती. मात्र मागील आठवड्यापासून वातावरण अनुकूल झाल्याने हे पाहुणे स्थिरावले आहेत, तर दुसरीकडे पक्षीअभ्यासक, निरीक्षक आणि पर्यटक सुखावले आहेत.

गणेशोत्सवानंतर आलेला पाऊस, ऑक्टोबर हीट तसेच अवकाळी पाऊस अशा हवामानातील बदलामुळे पोषक परिस्थिती नव्हती, मात्र आता पुन्हा थंडीच्या आगमनास सुरुवात झाल्याने पक्षी जिल्ह्यात दाखल होत आहेत. गुलाबी थंडीची चाहूल लागल्याने निसर्गरम्य रायगड जिल्ह्यात परदेशी स्थलांतरित पक्षी आणि काही स्थानिक स्थलांतरित पक्ष्यांची रेलचेल पाहायला मिळत आहे. वाढलेल्या गवंतामधील कीटक व आळ्या, साठलेल्या जलाशयामधील कीटक, कृमी, मृदुकाय जीव-जंतू तसेच समुद्र किनारे, दलदलीचे भाग यामधील छोटे खेकडे, मृदुकाय प्राणी, मासे, जल कीटक हे खाऊन पर्यावरणाचे संरक्षण व जैवविविधता समृद्ध करण्यात पक्ष्यांची भूमिका महत्वाची असते. या पक्ष्यांचे दर्शन जिल्ह्यातील समुद्रकिनारे, दलदलीच्या जागा, जंगले, भातशेती, खाड्या तसेच गवताळ प्रदेशात होत आहे. परिणामी पक्षी अभ्यासक व निरीक्षकांना तसेच पर्यटकांना ही मोठी पर्वणीच आहे.

उत्तर गोलार्धातील युरोप, रशिया आणि उत्तर अमेरिका यासारख्या देशात थंडीच्या दिवसात पडणाऱ्या बर्फामुळे जमिनीवरील भूभाग हा बर्फाने आच्छादलेला असतो. त्यामुळे पक्ष्यांना खाद्य मिळणे कठीण होऊन जाते. म्हणून हे पक्षी विविध देशात स्थलांतर करून आपली उपजीविका करतात. ➤ पान २ वर

> रायगड जिल्ह्यात ४०० हून अधिक पक्षी प्रजातींची नोंद आहे. स्थलांतरित पक्ष्यांसाठी येथे अनेक प्रकारचे पोषक नैसर्गिक अधिवास आहेत. त्यामुळे चांगल्या संख्येने पक्षी दाखल होतात. समुद्रकिनारे, पाणथळीचे प्रदेश, घनदाट जंगले, माळराने अशा अधिवासांमध्ये विविध प्रकारच्या पक्षी प्रजाती जिल्ह्यात थंडीच्या मोसमात येतात. पक्षी निरीक्षक आणि छायाचित्रकारांसाठी ही गुलाबी थंडी पर्वणीच असते.
>
> –शंतनु कुवेसकर, वन्यजीव अभ्यासक, माणगाव

स्थानिक पक्ष्यांचे आगमन

पॅराडाईज फ्लाय कॅचेर (स्वर्गीय नर्तक), इंडियन रोलर (भारतीय तास पक्षी), श्राईक (खाटिक), युरेशियन हुपू (हुदहुद), क्रेस्टेड बंटीग (युवराज)

परदेशी स्थलांतरित पक्ष्यांचा बोलबाला

ब्ल्यू थ्रोट (शंकर), युरोपियन रोलर (तास पक्षी), युरेशियन रायनेक (मानमोडी), सायबेरियन स्टोनचाट (गप्पीदास पक्षी), बंटिंग्स (भारीट पक्षी), पॅलिड हॅरिअर (पांढुरका भोवत्या) अशा परदेशी स्थलांतरीत पक्ष्यांचे दर्शन होत आहे.

११३ रक्तदात्यांची शहिदांना आदरांजली

। कर्जत । प्रतिनिधी ।

२६/११ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या स्मरणार्थ कर्जत मध्ये रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. ११३ रक्तदात्यांनी रक्तदान करून शहिदांना आदरांजली वाहिली आहे. रविवारी सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत - खालापूर तालुक्यातील ४८७ वे रक्तदान शिबीर ठरले.

या रक्तदान सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी १०५ वे रक्तदान केले. तर जेष्ठ पत्रकार विजय मांडे यांनी ६५ वर्षे पूर्ण होताना आपल्या जीवनातील शेवटचे म्हणजे ७५ वे रक्तदान केले तर कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड आणि त्यांच्या पत्नी प्रतिभा गरड यांनी एकाच वेळी रक्तदान केले.

कर्जत पोलीस ठाणे आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २६ /११ शहीद दिनाच्या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कर्जत पोलिस ठाण्याच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष आशिष गोखले, अभिजीत मराठे, मीना प्रभावळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक आर.बी रसेडे, पोलीस निरीक्षक एस. बी शिंदे, सहाय्यक फोजदार जगताप, सहाय्यक फौजदार राजेंद्र सुखदेव दुसाने आदी उपस्थित होते.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे सदस्य अभिजीत मराठे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून रक्तदान शिबिराचा शुभारंभ केला. कल्याण येथील संकल्प रक्तपेढीच्या डॉ.सोनाली देसाई, राजशेखर नायर, समृद्धी देसाई, रोहित औटी, सैका भोरडे, कौशल्या भामणे ,अलका भगडे, जय कल्विकट्टी आदींनी रक्त संकलनाचे काम केले.

याप्रसंगी राजेश लाड, रंजन दातार, भालचंद्र जोशी, निलेश परदेशी, पंकज शहा, मिलिंद खंडागळे, रोनक कोठारी , स्वप्नील येरुणकर, समीर भोईर, शरद रोकडे, प्रवीण लावरे, संतोष साळुंखे, वाकोजी कोलामकर, भरत पावरा, रवींद्र लोहकरे, जया खंडागळे, पूनम डोमे आदी उपस्थित होते.

संविधान दिनाचे औचित्य साधून समाज मंदिराचे भूमीपूजन

। रसायनी । वार्ताहर ।

२६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणुन साजरा केला जातो, या आजच्या दिवसाचे औचित्य साधून ग्रुप ग्रामपंचायत ईसांबे यांनी लोहोप बौद्धवाडा येथे सरपंच हिरामण राघो हिलम यांच्या हस्ते व ज्येष्ठ समाजसेवक रविंद्र जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत समाज मंदिर कामाचे भूमिपूजन केले. लोहोप बौद्धवाडा येथे समाज मंदिर इमारत बांधणे यासाठी ज्येष्ठ समाजसेवक व उद्योगपती रविंद्र जाधव हे प्रयत्नशील होते. त्यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश येऊन समाज मंदिर कामाला मंजुरी मिळाली आहे,त्याचा भूमिपूजन समारंभ आज संविधान दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत ईसांबे यांनी केले. यावेळी उपसरपंच ज्योती पाटील,सौ ज्योती विलास पाटील,ग्रामसेवक परीश नागरे, सदस्य वामन वाघे, समीर देवघर, मयुरी देवघर, मधुकर शिनगारे माजी सदस्य यांचे बबन पाटील, दर्शन पाटील, राजू निकाळजे, दर्शन पोळेकर यांच्यासह ग्रामस्थ लोहोप मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

अलिबागमध्ये संविधान जागर यात्रा

। रायगड । प्रतिनिधी ।

संविधानदिनाचे औचित्य साधून संविधान जागर समिती, अलिबागतर्फे रविवारी अलिबाग शहरात संविधान जागर यात्रा काढण्यात आली. २६ नोव्हेबर रोजी सकाळी १० वाजता अलिबाग शहारातील डॉ. बाबासाहेब आंबेडकार यांच्या पुतळ्याला अभिवादन करून संविधान जागर यात्रेला प्रारंभ झाला.

अलिबाग शहारातील मुख्य रस्त्यांवरून ही यात्रा जिल्हाधिकरी कार्यालयाजवळ हिराकोट तलाव येथे पोहचली. तेथे सभा घेऊन या यात्रेची सांगता करण्यात आली.

प्रा. अरविंद निगळे, प्रा. डॉ. पी. बी. आचार्य, बी. जी. पाटील, संजय वानखेडे, प्राचार्य साजिद शेख, शल्यचिकित्सक डॉ. अरुण गवळी, प्रा. डॉ. उत्तम गाढे, दादासाहेब खंडारे, उज्वला वानखेडे,मांडवी मोहल्ला अलिबाग अध्यक्ष फारुख भाई सय्यद, चावडी मोडला अलिबाग अध्यक्ष नसीम बुकबाईंडर, अफजल सय्यद, राजाराम मोरे, प्रल्हाद घेवदे, राम रोकडे, सर्वहारा जनआंदोलनाचे गायकवाड आणि जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते, जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाचे अधिकारी कर्मचारी, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे जिल्हा प्रतिनिधी, विश्वशांती बुद्ध विहार, ज्ञानदीप महिला मंडळाचे पदाधिकारी, आणि विविध शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि महिला संविधान जागर यात्रेत सहभागी झाले होते.

एचओसी रसायनीकरांचे कौटुंबिक स्नेहसंमेलन

। रसायनी । वार्ताहर।

एचओसी रसायनीमधल्या कधीही न विसरता येणाऱ्या आठवणी या आठवणी रवी ओंकार यांनी 'आठवणीतली रसायनी' या पुस्तकात लिहून आणि संकलित करून जागवल्या आहेत. रसायनीशी नाळ ते जोडलेल्या बऱ्याच रसायनीकरांची मनोगते या पुस्तकात समाविष्ट आहेत. यात असलेले जुने फोटो, कविता, लेख यामुळे हे पुस्तक नक्कीच सर्वांना भावेल. या प्रकाशनाच्या निमित्ताने एचओसी रसायनीकरांचे एक कौटुंबिक स्नेहसंमेलन आयोजित केले आहे. या कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद लाभला आहे. सभासद संख्येच्या मर्यादेमुळे नोंदणी बंद करण्यात आली आहे. एचओसीचे काही निवृत्त संचालक , अधिकारी, कर्मचारी, शाळेचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, डॉक्टर्स, रसायनीशी जोडलेली कुटुंब यांच्या गाठीभेटी या निमित्ताने होणार आहेत.

रसायनीकरांची मनोगते, गप्पा, ओळखी, जुन्या आठवणींची चित्रफीत, पुस्तक प्रकाशन, भोजन अशा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.सर्व एचओसी रसायनीकरांना कौटुंबिक सोहळ्याची उत्सुकता आहे.

भारती कातकरी यांचा सन्मान

। रसायनी । वार्ताहर ।

आदिवासी भागात, आदिवासी बांधव यांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करुन त्यांच्या उन्नती साठी विशेष प्रयत्न करणाऱ्या भारती दिलिप कातकरी यांचा सन्मान धारा आदिवासी सेवाभावी सामाजिक संस्था चौक यांच्या वतीने करण्यात आला.

भारती दिलिप कातकरी यांनी चौक, लोधिवली, नढाल येतील आदिवासी भागाबरोबर, डोंगर कपारीत राहणाऱ्या दुर्गम भागातील आदिवासी जनतेच्या हितासाठी, शैक्षणिक प्रगतीसाठी बचतगट यांच्या माध्यमातुन रोजगार निर्मिती, त्याला बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, कालबाह्य प्रथा यांचा नायनाट करणे, जातीचे दाखले, अंगणवाडीत मुलांचा शैक्षणीक श्रीगणेशा करणे अशी अनेक प्रकारची सामाजिक कार्य त्यांनी केले आहे, नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय जी २० परिषदेत त्यांची राज्यातून झालेली निवड आणि नवी दिल्ली येथे जी २० परिषदेत, त्यांच्या हस्ते झालेला जगातील मान्यवरांचा सत्कार, परिसरात केलेल्या कार्याची दिलेली माहिती यामुळे चौक परिसरातच नाही तर राज्यात त्यांच्या कार्याचा परिचय झाला आहे.त्यामुळे आदिवासी समाजासाठी कार्य करणाऱ्या धारा आदिवासी सेवाभावी सामाजिक संस्था यांच्या अध्यक्षा अक्षरा अविनाश चौधरी यांनी आज संविधान दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या उपस्थितीत शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन भारती दिलिप कातकरी यांचा सन्मान केला. यावेळी सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे अनेक मान्यवर उपस्थित होते.

भुजबळांचा जामीन रद्द करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे

■ मराठा समाज कर्जत समन्वयक उदय पाटील यांचे मत

। कर्जत । वार्ताहर।

छगन भुजबळांनी कारगृहात असताना छातीत दुखते, छातीत कळ येते. या आरोग्याविषयक गोष्टी सांगून न्यायालयातून जमीन मिळवला आणि आता ते मराठा आरक्षणाला विरोध म्हणून दिवसाला दोन - तीन सभा घेऊन मोठ मोठ्याने भाषणे देत आहेत. ते जमिनीवर सुटल्यापासून त्यांच्या छातीत अद्याप कळ आली नाहीं किंवा छातीचा त्रास झाला नाही. म्हणजे त्यांनी न्यायालयाची फसवणूक केल्यासारखे आहे. ते मराठा आरक्षणासाठी जीवाची बाजी लावणाऱ्या मनोज जरांगे - पाटील यांच्या विषयीसुद्धा आक्षेपार्ह बोलत आहेत. याचा अर्थ त्यांची तब्बेत आता ठणठणीत आहे. त्यामुळे सकल मराठा समाजाने सर्वोच्च न्यायालयात त्यांचा जमीन रद्द व्हावा यासाठी प्रयत्न केला पाहिजे. असे मत सकल मराठा समाजाचे कर्जत तालुक्यातील समन्वयक उदय पाटील यांनी व्यक्त केले.

सकल मराठा समाज कर्जतच्या वतीने रॉयल गार्डनच्या सभागृहात मनोज जरांगे यांच्या खोपोलीच्या सभेनंतर आढावा घेण्यासाठी व जमा - खर्चाचा हिशेब देण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी समन्वयक राजेश लाड, अनिल भोसले, शंकर थोरवे, मधुकर घारे, उदय पाटील, प्रकाश पालकर, रत्नाकर बडेकर, शिवाजी भासे, भगवान शिंदे, काशीनाथ शिंदे, उमेश म्हसे, अरुण थोरवे, प्रमोद खडे, रमेश कदम, सुरेश बोराडे, कैलास म्हामले आदी उपस्थित होते.

याप्रसंगी प्रास्ताविकात करताना राजेश लाड यांनी, खोपोलीमधील जरांगे - पाटील यांची सभा अतिशय चांगली झाली. या सभेला मराठा बांधव भगिनींनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली त्यांचे मी ऋण व्यक्त करतो. मराठा समाजाचे कर्जतमध्ये भवन व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सर्वांनी करणे आवश्यक आहे. असे स्पष्ट केले. शंकर थोरवे, उमेश म्हसे यांनीही आपले विचार मांडले. अनिल भोसले यांनी जमा - खर्च सादर केला तो एकमताने मंजूर करण्यात आला.

यावेळी कुणबी नोंदी संदर्भात तहसील कार्यालय येथे पंचायत समिती गट विकास अधिकारी, नगरपरिषद मुख्याधिकारी, प्रांताधिकारी, अशा अनेक अधिकाऱ्यांची बैठक बोलावून कुणबी नोंदी संदर्भात मराठा समाजाची एक समिती त्यावर नेमून त्यावर ही समिती लक्ष ठेवण्यास कटिबध्द असेल यासाठी प्रयत्न करणे. मनोज जरांगे यांनी खोपोलीमध्ये सांगितल्याप्रमाणे जर १ डिसेंबर पासून गावागावात साखळी उपोषण सुरू करायचे असतील तर कर्जत तालुका, कर्जत शहर, कडाव, कशेळे, कळंब, नेरळ, माथेरान या मुख्य ठिकाणी साखळी उपोषण सुरू करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

जरांगे - पाटील यांनी खोपोली सभेत जाहीर आवाहन केले आहे की, २४ डिसेंबर पर्यंत कोणतेही चुकीचे पाऊल उचलू नका , जेणेकरून त्याचा परिणाम सुरू असलेल्या आंदोलनावर होईल. याच पार्श्वभूमीवर तसेच याधीही आपण मागील सहा दिवसीय साखळी उपोषण दरम्यान महाराष्ट्र पेटलेला असतानाही आपण स्थानिक पातळीवर काही परिणाम होईल अशी भूमिका घेतली नव्हती, आणि आताही कर्जत तालुका सकल मराठा समाज जरांगे - पाटील यांच्या मार्गदर्शनखाली रायगड जिल्हा सकल मराठा प्रमुख समन्वयक जे निर्णय घेतील त्यांच्या सूचनांचे पालन करुन संपूर्ण कर्जत तालुका तशा सूचना तालुक्यात अमलात आणील याची सर्व समाजबांधवांनी नोंद घ्यावी. या मुद्यांवर चर्चा होऊन ठराव करण्यात आले.

१० वर्षीय सायकलपटूची शहिदांना श्रद्धांजली

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत - नेरळ गावात राहणारा १० वर्षीय शाळकरी विद्यार्थ्याने आज २६ नोव्हेंबर रोजी मुंबई हल्ल्यातील शहीद झालेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना आगळीवेगळी श्रद्धांजली वाहिली. हिरेन राम हिसाळगे या विद्यार्थ्याने कोणताही थांबा न घेता आणि भारताचा तिरंगा सायकलवर बांधून तब्बल ३४ किलोमीटर सायकल चालविली. नेरळ पोलीस ठाणे ते खोपोली पोलीस ठाणे असा प्रवास या १० वर्षीय विद्यार्थी असलेल्या सायकलपटू याने केल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

रविवारी सकाळी नेरळ पोलीस ठाणे येथून हिरेनने सायकल चालविण्यास सुरुवात केली आणि कोणताही थांबा न घेता हिरेनने चक्क ३४ किलोमीटर अंतर पार केले. नेरळ पोलीस ठाणे येथून निघालल्या हिरेनची सायकल थेट खोपोली पोलीस ठाणे येथे थांबली.

नेरळ येथून कल्याण कर्जत रस्त्याने तर पुढे कर्जत येथून पळसदरी खोपोली रस्त्याने हिरेनने खोपोली शहर गाठले. तेथे पोलीस ठाण्यात जाऊन शहीद स्मारकाला अभिवादन केले. हे ३४ किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी हिरेनला दोन तास १५ मिनिटांचा अवधी लागला. मात्र कुठेही थांबा न घेता त्याने हे अंतर पार केले.

पान १ वरून

राज्याला अवकाळीचा तडाखा

विजांचा कडकडाट, मेघगर्जना, गारपिटीसह मुसळधार पाऊस बरसला.

अचानक आलेल्या अवकाळी पावसाने तसेच गारपीटीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक ठिकाणी कौलारू घरांची कौले फुटली. शेतात व अंगणात सर्वत्र गारांचा खच पाहायला मिळाला. वादळी वाऱ्याने झाडे उन्मळून पडली. गारपिटीसह झालेल्या पावसाने कांद्याची रोपे, मका, चारा पिके, गहू, ज्वारी, हरभरा, फ्लॉवर, कोबी या पिकांसह फळझाडांना मोठ्या प्रमाणात फटका बसला असून उभी पिके भुईसपाट झाल्यामुळे शेतकरी हतबल झाला आहे. शासनाने तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी परिसरातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे. आगामी तीन दिवस पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

विजेच्या कडकडाटासह पाऊस

उरण तालुक्यात रविवारी (दि.२६) पहाटे विजेच्या कडकडाटासह तुरळक पावसाच्या सरी कोसळल्या, त्यामुळे उरणमधील प्रदूषणाच्या मात्रेत घट झाली आणि उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. मात्र, अचानक आलेल्या पावसामुळे गुरांचा चारा (भाताचा पेंढा) भिजला असून, वीटभट्टी व्यावसायिकांचे नुकसान झाले आहे.

पहाटे साडेपाच वाजता पावसाला सुरुवात झाली. हा पाऊस अर्धा ते पाऊण तास सुरू होता. मात्र, पाऊस गेला म्हणून निवांत झालेल्या शेतकऱ्याच्या चिंतेत वाढ झाली आहे. अनेक ठिकाणी मळणी करून भाताचा पेंढा ढीग करून ठेवला होता. हा पेंढा ओला झाला आहे. तर, काही शेतातील भातपीकही कापणी करण्याचे राहिले असून, त्याचेही नुकसान झाले आहे. तसेच वीटभट्टी व्यवसायाचे नुकसान झाले असल्याने व्यावसायिक, शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. हवामानबदलामुळे वीटभट्टी, आंबा व्यवसाय दरवर्षीच संकटात सापडत असल्याचे मत येथील शेतकरी आणि व्यावसायिकांकडून बोलले जात असून, होणाऱ्या नुकसानीमुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

आरोग्यसेवकाचा हृदयविकाराने मृत्यू

दुचाकीवरून हे तिघे सराईवाडीमध्ये पोहचले. तेथील पाण्याचे नमुने घेऊन परत असताना वारगुडा हे अचानक जमिनीवर कोसळले. जमिनीवर पडल्याने त्यांच्या तोंडाला आणि डोळ्याला दुखापत झाली. त्याचे सहकारी तिवरे आणि पारधी यांनी रुग्णवाहिका बोलवली मात्र अंतर जास्त असल्याने ती वेळेवर पोचली नाही.

नंतर खासगी गाडीने कशेळे ग्रामीण रुग्णालयात आणले. डॉक्टरांनी वारगुडा यांचा मृत्यू झाला असल्याचे जाहीर केले. त्यांचा मृतदेह कशेळे तेथून कर्जत उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला. नंतर अंतिम संस्कार करण्यासाठी त्यांची मृतदेह सुधागड येथे नेण्यात आला.

भाजप लोकसभेच्या २६ जागा लढणार

लोकसभेच्या ४८ जागा आहेत. २०१९ साली लोकसभा निवडणुकीला भाजपाने २५ आणि शिवसेनेने २३ जागांवर निवडणूक लढवली होती. त्यात भाजपाला २३, तर शिवसेनेला १८ जागा मिळाल्या होत्या.

महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघाचा सर्वेक्षण करण्यात आले आहे. आमच्याकडे विजयी होणाऱ्या उमेदवारांची माहिती प्राप्त झाली आहे. २०१९ साली निवडून आलेल्या खासदारांना पुन्हा उमेदवारी देणे ही परंपरा आहे. पण, हा अंतिम शब्द नाही. अंतिम निर्णय घेण्यापूर्वी विविध स्तरांवर चर्चा केली जाईल, असेही ते म्हणाले.

नागपूर येथील विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन पार पडल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरूवात होईल. अधिवेशनानंतर भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांच्या मतदारसंघनिहाय बैठका घेण्याचा आमचा विचार आहे. एखाद्या ठिकाणी भाजपाचा उमेदवार निवडणूक लढत असेल, तर शिवसेना आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते त्यांचा उमेदवार असल्यासारखे प्रचार करतील. हाच नियम शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या उमेदवारांबाबतही लागू होईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.

विदेशी पाहुणे स्थिरावल्याने पक्षी निरीक्षक सुखावले

आपल्याकडे पडणारी थंडी आणि पुरेशा प्रमाणात मिळणारे खाद्य तसेच योग्य अधिवास या सर्व कारणांमुळे या पक्ष्यांना घरटी बांधून पिल्लांचे संगोपन करणे सोपे जाते. म्हणून बऱ्याच स्थलांतरित पक्ष्यांचा विणीचा काळ सुद्धा हाच असतो, असे माणगाव तालुक्यातील विळे-भागाड येथील पक्षी अभ्यासक राम मुंडे यांनी सांगितले.

नवनिर्वाचित सरपंच, सदस्यांनी सजग रहावे

कामाला प्रथम प्राधान्य देऊन जास्तीत जास्त वेळ लोकांसाठी द्या. विजय झाला म्हणून गाफील राहू नका, लोकांनी आपल्याला त्यांची कामे करण्यासाठी निवडून दिले आहे. हे कधीच विसरु नका असा सल्लादेखील त्यांनी दिला. यावेळी नवनिर्वाचित सदस्यांनी माझेरी रस्ता, पाणी प्रश्न सोडवण्यासाठी मागणी केली.

हे दोन्ही प्रश्न लवकरच सोडविण्याचे आश्वासन माजी आमदार पाटील यांनी दिले. याप्रसंगी पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहीर नोटीस

खालील सर्व ग्राहकांना सूचित करण्यात येते की, दिनांक २८/११/२०२३ रोजी सकाळी ५:०० वाजेपासून ते दुपारी ३ वाजेपर्यंत गेल कंपनीच्या जड उपकरण वाहतुकीसाठी २२ kv उसर एक्सप्रेस व २२ kv ओल्ड उसर फीडर वरील कुरूळ ते वाढव या परिसरातील सर्व गावे आणि रामराज व फणसापूर शाखेअंतर्गत येणारे सर्व गावांना विद्युत पुरवठा बंद राहील याची नोंद घ्यावी.

सही/-
अतिरिक्त कार्यकारी अभियंता
अलिबाग १ उपविभाग

Tender Invitation: IBG Marigold CHSL
IBG Marigold CHSL, Panvel, invites tenders for:

1.	Security Services
2.	Housekeeping Services
3.	Canopy Installation

Details at https://marigold.ibgreens.in/tenders/
Submit bids by 08th`December 2023.

Regards,
Secretary, IBG Marigold CHSL

बाप्पांची नगरी फलकबाजीमुळे विद्रुप

। पेण । प्रतिनिधी ।
गणपती मूर्तीचे माहेरघर आणि पापड उद्योगासाठी प्रसिध्द असणारे पेण शहर जाहिरात फलकबाजीमुळे विद्रुप झाले आहे. गेल्या सात महिन्यात फक्त ११ जणांनीच नगर परिषद प्रशासनाकडून फलक लावण्यासाठी परवानगी घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे उर्वरीत फलक लावणाऱ्यांवर कारवाई कधी करणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

एकीकडे पेण पालिका स्वच्छ भारत अभियान राबविण्याचे काम करत आहे. शहरातील स्वच्छतेसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवून जनजागृतीसाठी लाखो रुपये खर्च करत आहे. मात्र, दुसरीकडे याच अभियानाकडे पाठ फिरवून अनेक जाहिरातदार पेण पालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृतपणे फलकबाजी करून शहराचे विद्रुपीकरण करत आहेत. पेण शहरात शेकडो जाहिरातींचे फलक झळकत आहेत. त्यावरून खऱ्या अर्थाने पालिकेला लाखो रुपयांचा कर उपलब्ध होणे क्रमप्राप्त होते, मात्र आश्चर्याची बाब म्हणजे पेण पालिकेला मागील सात महिन्यात फक्त अकरा जाहिरातदारांच्या माध्यमातून फक्त ३९ हजार ३८० रुपयांचा कर प्राप्त झाला आहे. राजकीय पुढारी तसेच शिकवणी वर्ग चालवणारे बेधडकपणे जाहिरातीचे फलक लावत आहेत. राजकीय पुढारी तर वाढदिवसाला १० ते १५ दिवस अगोदरच फलक लावून स्वतःचीच जाहिरात करताना दिसत आहेत. हुतात्मा स्मारकात ठिकाणी देखील फलक लावण्यात आले आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात नगरपालिकेचा महसूल बुडविला जात आहे. त्यामुळे या शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्या आणि शासकीय नियम धाब्यावर बसवून पालिकेचा कर बुडवणाऱ्या जाहिरातदारांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी पेण शहरातून होत आहे.

पेण शहरामध्ये अनधिकृत बॅनर लावण्याला सर्वस्वी जबाबदार नगरपालिकेचे अधिकारी आहेत. कर आकारण्याबाबत कोणतीही नियमावली तयार करण्यात आलेली नसल्याने अधिकारी फलक लावणाऱ्यांकडून अव्वाच्या सव्वा कर आकारत आहेत. प्रशासन पुढाऱ्यांच्या विरुध्द कारवाई करताना दिसत नाही. राजकीय पुढारी आठ ते दहा दिवस अगोदर आपले फलक लावून शहराच्या विद्रुपीकरणात भर पाडत आहेत. फलक छपाई करणाऱ्यांचा व्यवसाय आहे. त्यांच्यावर कारवाई करणे म्हणजे चोर सोडून संन्याशाला पकडण्याचा प्रकार आहे. स्वतःच्या चुका लपवण्यासाठी फलक छपाई व्यवसायिकांना जबाबदार धरू नये, अशी मागणी माजी नगरसेवक संतोष पाटील यांनी केली आहे.

> पेण शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत फलक लावले जात आहेत. वेळोवेळी कारवाई केली जात आहे. मात्र हे अनधिकृत फलक लावण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहेत. आम्ही तातडीने पुन्हा एकदा अतिक्रमण विभागाला कारवाईचे आदेश देत असून पेण शहरात ज्या फलक बनविण्याच्या छपाई यंत्रणा आहेत त्यांना सुद्धा जोपर्यंत पालिकेत कर भरल्याची पावती जाहिरातदार दाखवणार नाही तोपर्यंत फलक छपाई करण्यात येऊ नये अन्यथा त्यास तुम्ही जबाबदार असाल अशा प्रकारची नोटीस देखील तातडीने काढत आहोत.
> - सुहास कांबळे, नगर अभियंता पेण न. पा.

अनधिकृत भंगार गोडाऊनला भीषण आग

। पनवेल । वार्ताहर ।

मोठा खांदा येथील ट्रायसिटी सोसायटी आणि सद्गुरू युनिव्हर्सल सोसायटीमध्ये असलेल्या मोकळ्या मैदानात अनधिकृतपणे उभारलेल्या भंगार गोडाऊनला शनिवारी रात्री लागलेल्या भीषण आगीत मोठे नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.

येथील सेक्टर १७ मधील दोन इमारतीच्या बाजूला असलेल्या मोकळ्या मैदानात बेकायदेशीररित्या अनधिकृत भंगार गोडाऊन उभारण्यात आले होते. येथील भंगाराच्या सामानाला अचानकपणे आग लागल्याने आगीच्या ज्वाला मोठ्या प्रमाणात पसरत गेल्या. ड्रम, लोखंडी, लाकडी, प्लास्टीकच्या सामानामुळे आग अधिक भडकली होती. या आगीची झळ बाजूच्या इमारतीला बसून तेथील बागेचे मोठे नुकसान झाले.

या घटनेची माहिती मिळताच पनवेल, कळंबोली महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून ही आग आटोक्यात आणली. या आगीत मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे.

प्रशांत नाईक मित्रमंडळ आयोजित रक्तदान शिबीर

१०५ रक्तदात्यांनी केले रक्तदान

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीबाग येथील कच्छी भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रशांत नाईक मित्रमंडळ यांनी जिल्हा शासकीय रक्तपेढी यांच्या सहाय्याने आयोजित रक्तदान शिबिराला अलिबागकारांनी भरभरून प्रतिसाद दिला. या शिबिरात १०५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी जिल्हा शासकीय रक्तपेढीचे संक्रमण अधिकारी दीपक गोसावी यांनी रक्तदानाच्या फायद्याबाबत माहिती देताना सांगितले की, रक्ताला पर्याय नाही, तो निर्माण होऊ शकत नाही, म्हणून आपण रक्तदान करून इतरांना जीवनदान दिले पाहिजे. १८ ते ६० वयोगटातील निरोगी व्यक्ती ज्याचे वजन ४५ किलोपेक्षा जास्त आहे ते रक्तदान करू शकतात. दर तीन महिन्यांनी ३०० ग्रॅम रक्तदान करता येते.असे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अलिबाग नगर परिषदेचे माजी गटनेते प्रदीप नाईक, अक्षया नाईक, सागर पेरेकर, रवी थोरात, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, अशोक प्रधान, कपिल अनुभवणे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

> एखाद्याचा जीव वाचवण्यासाठी रक्तदान करणे आवश्यक आहे. प्रत्येकजण स्वतःसाठी जगतो, पण इतरांसाठी जगणे ही मोठी गोष्ट आहे. ते जीवनदान करण्यासारखे मानले जाते. रक्तदान केल्याने समोरच्या व्यक्तीचा जीव तर वाचतोच, पण रक्तदात्याला निरोगी होण्यासही मदत होते, त्यामुळे ते दोघांसाठीही फायदेशीर आहे.
> – अनिल चोपडा, माजी नगरसेवक अलिबाग नगर परिषद

> एका व्यक्तीच्या रक्तदानामुळे दोन-तीन रुग्णांचे प्राण वाचतात. नियमितपणे रक्तदान केल्याने शरीरात नवीन रक्त तयार होण्याची प्रक्रिया सुरळीत सुरू राहते व रोगप्रतिकारशक्ती वाढते. त्यामुळे संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजारांची लागण होण्याचे प्रमाणही नगण्य राहते; म्हणून निरोगी राहायचे असेल, तर रक्तदान करा.
> – रवी थोरात,रक्तदाता

शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

। कर्जत । वार्ताहर ।

शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नुकतेच जाहीर पक्ष प्रवेशाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिवसेना ठाकरे गटातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

याप्रसंगी मावळ लोकसभा निरीक्षक माधवी जोशी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य नरेश जोशी, जिल्हाध्यक्ष सुरेश टोकरे, कार्याध्यक्ष तानाजी चव्हाण, जैबुननीता शेख, हमीद शेख आदी उपस्थित होते. कर्जत तालुका भावी अध्यक्ष शंकर भुसारी, पनवेल तालुका अध्यक्ष डॉ. साईनाथ डोईफोडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

शिवसेना ठाकरे गटाचे खोपोली संपर्क प्रमुख हमीद शेख यांनी देखील प्रवेश केला.शिवसेनेच्या अल्पसंख्याक सेलच्या जिल्हाध्यक्ष जैबुननिता शेख यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कसा पुन्हा उभारी घेईल. यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. यासाठी आपल्याला मेहनत घ्यावी लागणार असल्याने सर्वांनी तयारीला लागा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष सुरेश टोकरे यांनी केले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नायब तहसिलदार, तहसिलदारांचा बेमुदत कामबंदचा इशारा

। रसायनी । वार्ताहर ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तत्कालीन अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतरही मुख्य अप्पर सचिव (महसूल) यांचा मनमानी कारभार सुरूच आहे. या विरोधात १ डिसेंबरपासून नायब तहसिलदार, तहसिलदार हे संपावर जाणार आहेत.राज्यातील ३६ जिल्ह्यात संपाची हाक देण्यात आली आहे, अशी माहिती म हाराष्ट्र राज्य तहसिलदार व नायब तहसिलदार संघटनेने दिली.

३ मार्च २०२३ रोजी राज्यभरातील तहसिलदार नायब तहसिलदार यांनी बेमुदत कामबंद आंदोलन केले होते. त्यानतंर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व तत्कालीन अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तहसिलदार संघटनेची मागणी मान्य करीत स्वाक्षरी करुन राजपत्रित वर्ग २ यांचे ग्रेड पे ४८०० रुपये वाढवण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली.

शिंदे, फडणवीस आणि महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या प्रस्तावाला अप्पर मुख्य सचिवांकडून केराची टोपली दाखवली जात असल्याचे तहसीलदार संघटनेकडून सांगण्यात आले. त्यामुळे राज्यभरातील तहसिलदार नायब तहसिलदार यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

अतिरिक्त जबाबदाऱ्या व अधिकार दिले जातात मात्र पगारवाढ होत नसल्याने येत्या १ डिसेंबरपासून राज्यभरात बेमुदत संप केला जाणार असल्याचे पत्र महसूलमंत्री व अप्पर मुख्य सचिव महसूल यांना ३० ऑक्टोबर २०२३ रोजी देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

संपामुळे शेतकरी आणि शालेय विद्यार्थ्यांना आता नवीन वर्षात शासकीय दाखल्यापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याचबरोबर शासन आपल्या दारी ह्या उपक्रम ाला देखील फटका बसणार असल्याचे बोलल जाते.

सर्वच विभागांना महसूल विभागाची गरज असते. तहसीलदार हे तालुक्याचे कार्यकारी दंडाधिकारी असतात, तसचे कायदा सुव्यवस्थेची मोठी जबाबदारी त्यांच्यावर असते. तहसिलदार व नायब तहसिलदार संघटनेया आंदोलनामुळे सरकारसह नागरिकांची कामे रखडण्याची शक्यता आहे.

● हवामान खात्याने वादळवारा पावसाचा इशारा दिल्याने सुरक्षेच्या दृष्टीने अलिबागमधील कोळी बांधवानी आपल्या मासेमारी नौका माघारी बोलवून किनारी शाकारून ठेवल्या आहेत (छायाचित्र- समीर मालोदे)

म्हसळा नगर पंचायतीचे सुशोभीकरण अभियान यशस्वी

। म्हसळा । वार्ताहर ।

नगर पंचायतीमध्ये मासिक सुशोभीकरण अभियान राबविण्यात आले. त्यानुसार पाभराफाटा ते हिंगुलडोह या मार्गावर म्हसळा नगरपंचायतीद्वारे स्वच्छता, अतिक्रमण मोहीम राबविण्यात आली. सदर मोहिमेत नगरपंचायत कर्मचारी, सफाई कर्मचारी आणि नागरिकांनी सहभाग घेतला.

रस्त्यांची साफसफाई, गटारनाल्यांची सफाई, अनधिकृत फलक काढणे, रस्त्यालगतची अनावश्यक झाडे तोडणे अशी कामे करण्यात आली. तसेच गटारांमध्ये किटकनाशक फवारणी करण्यात आली. यावेळी नगरपंचायतीतर्फे अनधिकृत अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली. त्यावर काही व्यावसायिकांनी नाराजी व्यक्त केली.

पनवेलकरांना १०० रूपये दराने टँकरचा पाणीपुरवठा

। पनवेल । वार्ताहर ।

महापालिका क्षेत्रात आणखी आठ दिवस २० टक्के पाणीकपात सुरू राहणार आहे. सिडकोने या दरम्यान, रहिवाशांना पाण्याची टंचाई भासू नये यासाठी १०० रुपये दराने एक टँकर पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नागरिकांना आता अधिकचे पैसे खर्च करुन टँकरच्या पाण्याचा वापर करावा लागणार आहे.

करंजाडे वसाहतीमध्ये पाणीकपात सुरू करण्याच्या आधीपासून अनेक दिवस टंचाईचा सामना रहिवाशी करत आहेत. नागरिकांमध्ये सिडको आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठ्याच्या कारभाराविरोधात नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. त्यामुळे सिडकोने पाणीपुरवठा टँकरने करण्याचा निर्णय घेतल्याने नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची २७ तारखेपर्यंत टप्प्याटप्प्याने पाणीकपातीचा निर्णय घेतला आहे. यामध्ये सर्वाधिक झळ सिडको वसाहतीमधील नागरिकांना बसणार आहे.

करंजाडे येथील नागरिकांनी एका सोसायटीत दिवसाला चार टँकर पाणी लागत असून एका टँकरसाठी दोन हजार रुपये मोजावे लागत असल्याने रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे सिडकाने एक टँकर पाणी (१० हजार लिटर) शंभर रुपयांमध्ये संबंधित गृहनिर्माण संस्थेला पोहोच करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती सिडकोच्या जनसंपर्क विभागाच्या मुख्य जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांनी दिली. तसेच टँकरसाठी लागणारी शंभर रुपये रक्कम कोणत्याही कर्मचाऱ्याच्या हाती न देता संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या पाणीपुरवठ्याच्या देयकामध्ये त्याचा समावेश केला जाईल, असे सिडकोने स्पष्ट केले आहे.

शनिवारी आसूडगाव, खांदा कॉलनी, त्यानंतर रविवारी नवीन पनवेल पूर्व बाजूकडील, सोमवारी पनवेल पालिका आणि पोदी अशी टप्प्याटप्प्याने पाणीकपात केली जाणार आहे.

या कालावधीत या परिसरातील नागरिकांना पाणीटंचाई भासू नये यासाठी सिडको मंडळाने संबंधित वसाहतींच्या पाणीपुरवठा कार्यालयाकडे रहिवाशांनी तक्रार केल्यावर तेथील पाणीपुरवठा विभागातील अभियंते खरोखरच टंचाई आहे का याची चाचपणी करणार आहेत, त्यानंतरच टँकरने पाणीपुरवठा संबंधित गृहनिर्माण संस्थेला केला जाणार आहे.

कल्याण-डोंबिवलीत अवकाळी पाऊस

डोंबिवली : कल्याण परिसरात रविवारी सकाळी साडेसहा वाजता विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसाने कल्याणमधील भाजीपाला बाजारातील व्यापाऱ्यांची एकच धावपळ झाली.

सकाळीच व्यवसाय विक्रीसाठी बाहेर पडलेले व्यावसायिक अचानक आलेल्या पावसाने गोंधळून गेले. वृत्तपत्र विक्रेत्यांची ही पळापळ झाल्याचे दिसून आले. अवकाळी पावसामुळे रस्ते निसरडे झाले होते. कामानिमित्त बाहेर जाणाऱ्यांनी आपापल्या छत्र्या, रेनकोट बाहेर काढल्याचे दिसले.

सलग सुट्ट्यांमुळे पालीत भाविकांची गर्दी

वाहतूक कोंडीचा तिढा सुटेना

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

शनिवार ते सोमवार अशा सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे अष्टविनायकाचे स्थान असलेल्या बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीत भाविकांची गर्दी झाली आहे. शिवाय पालीतून अन्य पर्यटक देखील दक्षिण रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग तसेच मुंबई, पुण्याकडे जात आहेत. परिणामी पर्यटक व भाविकांच्या गाड्यांमुळे शनिवारी आणि रविवारी पालीत वाहतूक कोंडी झाली.

पाली पोलिस व देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी तैनात आहेत. मात्र वाहनांची संख्या जास्त असल्याने त्यांची दमछाक होत आहे.

पालीतील ॲड. स्वराज मोरे यांनी सांगितले की, वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीवर नगरपंचायत प्रशासन व पोलिसांकडून ठोस उपाययोजना करण्यात यावी. नगरपंचायतीमार्फत काही ठिकाणी रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे. मात्र त्याने काहीही फायदा झालेला दिसत नाही. शिवाय रस्ते खराब असल्याने धुरळ्याचा प्रचंड त्रास होत असून नागरिक बेजार झाले आहेत.

यामुळे वाहतूक कोंडी

सलग सुट्ट्यांमुळे मोठ्या प्रमाणात गाड्या व बसेस पालीत दाखल होत आहेत. शिवाय येथील अरुंद रस्ते, नो एन्ट्रीमधून जाणारी वाहने, मोठ्या व अवजड वाहनांची रेलचेल, वाहतुकीचे नियम मोडणारे वाहनचालक आदी कारणांमुळे पालीत वारंवार वाहतूक कोंडी होते. अरुंद रस्त्यांमुळे दोन्ही बाजुने आलेल्या वाहनांना जाण्यासाठी जागा मिळत नाही. परिणामी वाहने अडकून पडून वाहतूक कोंडी होते. मंदिर परिसरातदेखील अवैधरित्या पार्क केलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते. त्यामुळे भाविकांची गैरसोय होत असून त्याचा त्रास स्थानिकांना देखील होत आहे.

> पालीतील काही ठिकाणचे अनधिकृत बांधकाम हटवले आहे. रस्ते रुंद केले आहेत. पालीत येणारे व जाणारे रस्त्यांचे डांबरीकरण केले आहे. सर्व वाहन चालकांनी वाहतुकीचे नियम पाळणे गरजेचे आहे.
> - प्रणाली सूरज शेळके, नगराध्यक्ष, नगरपंचायत, पाली

बोगद्यातील लढाई

निसर्ग आणि माणूस यांचा झगडा पुरातन आहे. तो आजही चालू आहे. फरक इतकाच आहे की, पूर्वी माणसाला निसर्गाने वेढलेले होते. आता निसर्गाला माणसाने वेढले आहे. आपल्या सोईसाठी माणसाने निसर्गाची वाटेल तशी मोडतोड चालवली आहे. आपण यंत्र-तंत्रांनी काय वाटेल ते करू शकतो असा माणसाचा समज झाला आहे. पण निसर्गाचे सर्व नियम आपल्या कह्यात आलेले नाहीत हे तो विसरतो. त्यामुळेच मग उत्तरकाशीसारख्या दुर्घटना घडतात. उत्तराखंड हे हिमालयाच्या रांगांमधील उत्तरेचे टोकाचे राज्य आहे. हिमालय हा जगातला तरुण आणि ठिसूळ पर्वत मानला जातो. या भागात गेल्या काही वर्षांपासून आपल्या सरकारांनी अंदाधुंद विकास सुरू केला आहे. जिकडेतिकडे रस्ते, धरणे, वीज प्रकल्प उभारणे चालू आहे. यासाठी हिमालयाच्या पर्वतरांगा अजस्त्र यंत्रसामग्री लावून पोखरल्या जात आहेत. सपाट केल्या जात आहेत. मुंबईसारख्या शहरात बांधलेली एखादी उंच इमारत किंवा पूल तोडणे तुलनेने सोपे असते. त्या इमारती वा पुलाची बांधणी कशी झाली आहे हे आपल्याला ठाऊक असते. विटा कशा रीतीने रचल्या गेल्या आहेत याचा आराखडा माहिती असतो. हिमालयासारख्या पर्वतात बांधकाम करताना प्रचंड प्रकारचा अभ्यास करावा लागतो. मातीची रचना, डोंगर किती घट्ट वा ठिसूळ आहेत हे पाहिले जाते. तरीही तेथील खडक, सुळके, हे एकमेकांशी कसे जोडले गेले आहेत याचा पूर्ण अंदाज येतोच असे नाही. समोर दिसते वा यंत्रांनी मोजले जाते आतली भूशास्त्रीय भूमिती गुंतागुंतीची असते. सध्या उत्तराखंडमध्ये आपल्याला त्याचाच प्रत्यय येतो आहे. उत्तरकाशी जिल्ह्यातील एका बोगद्याचे काम चालू असताना ते कोसळून ४१ मजूर आत अडकले आहेत. गेले पंधरा दिवस त्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. पण आधी वाटले होते तशी बोगद्यातील ही लढाई सोपी नाही.

अनेक आव्हाने

यमुना नदीचा उगम होतो त्या यमुनोत्रीला जोडण्यासाठी हा रस्ता तयार केला जात आहे. त्यात एका मोठ्या डोंगराखालून साडेचार किलोमीटर लांबीचा बोगदा खणला जात असून त्यामुळे सुमारे वीस किलोमीटरचा फेरा वाचणार आहे. भारतभरात खूप पूर्वीपासून सर्व भागात बोगदे केले गेले आहेत. रस्ते व रेल्वेमार्गावर अनेक बोगदे आहेत. मुंबईला महाराष्ट्राशी जोडणारा रेल्वेमार्ग पारसिकच्या बोगद्यातूनच जातो आणि तो जवळपास दीडशे वर्षे जुना आहे. खंडाळ्याच्या घाटातील बोगदे आहेतच. आपल्याकडे कोकण रेल्वेवरही अनेक बोगदे आहेत. जगभरात टनेल इंजिनिअरिंग किंवा बोगद्यांचे तंत्रज्ञान ही एक स्वतंत्र अभ्यासशाखा आहे. पण म्हणून भूरचना कशीही असली तरी तेथे माणूस बोगदे करू शकतो असे नव्हे. शिवाय ते करण्याचे व त्याच्या वापराचे काही नियम असतात. उदाहरणार्थ कोणताही बोगदा खणताना दर एक किलोमीटर अंतरावर त्यातून बाहेर येण्यासाठी एक वेगळा सुरक्षित मार्गही तयार करून ठेवावा लागतो. म्हणजे समजा मागे खणलेला भाग कोसळलाच, जसे की आता झाले आहे, तर आतमध्ये अडकलेल्यांना सोडवण्यासाठी पर्याय उपलब्ध राहतात. हा बोगदा खणताना असा कोणताही सुरक्षित मार्ग ठेवला गेला नव्हता. नवयुग नावाची कोणी कंपनी हे काम करीत आहे. तिने तसे का केले नाही व तिच्यावर कोणाही सरकारी यंत्रणेची देखरेख नव्हती का हा कळीचा प्रश्न आहे. मजुरांचे सुदैव असे की, आतमध्ये खोदलेला भाग सुमारे चार किलोमीटर आहे. त्यातल्या दोन किलोमीटर भागात ते फिरू शकत आहेत. त्यात ते अडकले असले तरी चेपले गेलेले नाहीत. त्यांचा बाहेर पडण्याचा मार्ग मात्र सोपा नाही. कारण मागे खोदलेल्या रस्त्यावर कोसळलेल्या माती व दगडांचे शेकडो फुटांचे ढीग आहेत. बाहेरच्या खडकांमधून तसेच या ढिगांमधून अधिक पडझड न होता कामगारांना वाचवणे हे सर्वांसमोर मोठे आव्हान आहे. अमेरिका व ऑस्ट्रेलियापासूनचे तज्ज्ञ यासाठी काम करीत आहेत.

विकासाचा फेरविचार

तूर्तास या कामगारांसाठी अन्नपाणी पोचवण्याकरिता छोटे पाईप टाकण्यात यश आले आहे. आतमध्ये वीजही उपलब्ध आहे. मात्र कामगार बाहेर येऊ शकतील इतके मोठे पाईप टाकणे मात्र शक्य झालेले नाही. हे पाईप किंवा असा रस्ता करण्यासाठी सर्व पर्यायांचा विचार केला जात आहे. बोगद्याच्या वरून छिद्र पाडावे की, बोगद्याच्या दोन्ही भिंतीतून मार्ग काढावा याचाही विचार चालू आहे. अखेर काही ना काही रीतीने मजुरांची सुरक्षित सुटका व्हावी अशीच सर्व देशवासियांची इच्छा आहे. पण ते फारसे सोपे नाही. परवापर्यंत एक दिवसाच्या आत सुटका होईल असे म्हटले जात होते. आता एका परदेशी तंत्रज्ञाने नाताळ साजरा करायला हे कामगार घरी जाऊ शकतील असे म्हटल्याने आणखी एक महिना ही मोहिम चालणार की काय अशी शंका निर्माण झाली आहे. यात सुटकेसाठी वापरली जाणारी यंत्रसामग्री तुटल्यामुळे दगड फोडण्याचे काम हाताने करावे लागत आहे. हे एकूणच प्रकरण आपल्या सर्वांचे डोळे उघडणारे आहे. हिमालय असो वा आपला सह्याद्री. सध्या डोंगर फोडून बेबंद बांधकामांचे पेव फुटले आहे. मुंबई-पुणे, पुणे-सातारा किंवा मुंबई- नाशिक या दरम्यानचे घाट आपण तोडून झाले आहेत. मात्र तरीही रस्ते आणखी वेगवान व चढण आणखी कमी करण्यासाठी नवनव्या बोगद्यांच्या योजना हाती घेतल्या जात आहेत. हिमालयात पर्यटनाचा विकास आणि लष्कराची वेगवान वाहतूक या नावाखाली प्रचंड प्रमाणात रस्ते बांधले जात आहेत. तेथील डोंगररांगांना व पर्यावरणाला हे मानवणारे आहे काय याचा विचार केला जात नाही. विकासकामे करताना सरकारी आणि शास्त्रीय नियम सर्रास तुडवले जातात. गरीब मजूर आणि त्यांचे लबाड ठेकेदार यांच्या भरवशावर ही कामे सोडली जातात. त्यांच्यावर वचक असा जवळपास नाहीच. हे असेच चालू राहिले तर एका बोगद्यातून सुटका होईल, पण संकटांच्या आणखी मोठ्या बोगद्यात आपण कोंडले जाऊ.

विचार

समाजजीवनाला लागलेली 'पनौती'

प्रचाराच्या रणधुमाळीमध्ये राजकीय पक्ष मुद्यावरून गुद्यावर येताना दिसत आहेत. नरेंद्र मोदी यांना 'पनौती' म्हणून दूषण देण्यात अलिकडेच राहुल गांधी यांनी धन्यता मानली. अर्थात अशी हलकी भाषा वापरताना नेत्यांना आपल्या वक्तव्याचे परिणाम कळत नाहीत का, असा प्रश्न निर्माण होतो. का मग अशा वक्तव्यांचेही चाहते असल्याने सवंग लोकप्रियतेसाठी अश्लाघ्य विशेषणे आणि शिव्या वापरल्या जातात?

राही भिडे

निवडणुका विचारावर लढवल्या पाहिजेत. विकासकामांना आणि मूलभूत मुद्यांना निवडणुकीत स्थान मिळायला हवे; परंतु राजकीय पक्ष आता मुद्यावरून गुद्यावर आले आहेत. भावनिक मुद्यांना महत्त्व यायला लागले आहे. पूर्वी प्रचार संपल्यानंतर परस्परविरोधी निवडणूक लढवत असलेले नेते एकत्र जेवण करत. परस्परांची आस्थेने विचारपूस केली जात असे. आता विचाराची जागा अविचाराने घेतली आहे. परस्परांना दूषणे देण्यात, एकमेकांची उणीदुणी काढण्यात आणि परस्परांना शेलकी विशेषणे देण्यात धन्यता मानली जात आहे. त्यात आता कुणाचाही अपवाद राहिलेला नाही. केवळ उठवळ नेतेच नाही, तर सोनिया गांधी, राहुल गांधी, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गिरीराज सिंह, साध्वी प्रज्ञासिंह, उमा भारती, असदुद्दीन ओवैसी, योगी आदित्यनाथ, दिग्विजय सिंह, मणिशंकर अय्यर, जयराम रमेश, कैलास विजयवर्गीय, अबू आझमी आदी अनेक नेते वाचाळवीराची भाषा बोलतात. पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेसच्या नेत्याने एखादे वादग्रस्त करावे आणि त्याचा अलगद फायदा उठवावा, या प्रतीक्षेत भाजप होता. गुजरातच्या निवडणुकीत सोनिया गांधी यांनी मोदी यांना 'मौत का सौदागर' तर मणिशंकर अय्यर यांनी 'नीच' संबोधले. एखाद्या संकटाचे संधीत रुपांतर करणे मोदी यांना चांगलेच जमते. गुजरात राज्य मोदी यांच्या हातात येण्यासाठी काँग्रेसच्या नेत्यांनी वापरलेल्या शेलक्या विशेषणांचा मोठा वाटा होता, हे विसरता येणार नाही. या वेळीही तसेच झाले. मोदींच्या उपस्थितीमध्ये विश्वकरंडक स्पर्धेत भारताचा पराभव होताच राहुल गांधी यांनी त्यांच्याबाबत 'पनौती' या शब्दाचा वापर केला. या निमित्ताने राजकारण्यांच्या सतत घसरणाऱ्या भाषेची पुन्हा चर्चा सुरु झाली.

अहमदाबादमध्ये विश्वचषकाचा अंतिम सामना सुरू होता. त्याच दिवशी मोदी राजस्थानमध्ये प्रचार करत होते. त्यानंतर ते सामना संपण्यापूर्वी स्टेडियमवर पोहोचले. अंतिम सामन्यांबाबत संपूर्ण देशात उत्कंठा होती. भारत हा सामना हरला. मोदी यांनी विजयी कर्णधाराला चषक दिला आणि ते थेट भारतीय संघाच्या ड्रेसिंग रुममध्ये गेले. मोदी यांनी 'चांद्रयान मिशन २'च्या अपयशानंतर रडत असलेल्या इस्रो प्रमुखाचे सांत्वन केले, त्याच प्रकारे खेळाडूंना मिठी मारताना सांत्वन केले. मोदी यांनी स्टेडियममध्ये पोहोचून खेळाडूंच्या ग्रीन रूममध्ये प्रवेश केल्याने काँग्रेस नेते राहुल गांधी कमालीचे नाराज झाले. त्यामुळेच विश्वचषकातील टीम इंडियाच्या पराभवासाठी त्यांनी मोदी यांना जबाबदार धरले. राजस्थानमधील एका सभेत राहुल यांनी जनगणना करण्याच्या काँग्रेसच्या वचनाचा पुनरुच्चार केला. नंतर ते अचानक विश्वचषकाकडे वळले. राहुल गांधी मोदी यांना त्यांच्या विधानाची आठवण करून दिली आणि म्हणाले, मोदी जात मानत नाहीत आणि गरिबीला सर्वात मोठी जात म्हणतात, मग ते स्वतः ओबीसी कसे झाले? पूर्वी प्रत्येक मोदी यायचे आणि म्हणायचे, मी ओबीसी आहे.. आठवते? हे ऐकून गर्दीतील काही लोकांनी 'पनौती-पनौती' म्हणत ओरडण्यास सुरुवात केली. सभेला आलेल्या लोकांची व्यंग्यात्मक टीका ऐकून राहुल गांधी म्हणाले, हो काय... व्यंग, व्यंग... आमच्या मुलांनी तिथे विश्वचषक जिंकला असता... पनौतीचा पराभव झाला. टीव्हीवरचे लोक हे म्हणणार नाहीत; पण जनतेला हे माहीत आहे. राहुल यांनी हे सांगताच रॅलीत उपस्थित काही लोकांनी मोदी यांच्यासाठी 'पनौती-पनौती' असा नारा दिला. त्यानंतर राहुल गांधी म्हणाले, पीएम म्हणजे पनौती मोदी.

मोदी यांना राहुल यांनी पनौती म्हटल्याने भाजपच्या हाती आयते कोलित मिळाले. अर्थात त्या अगोदर मोदी यांनीही राहुल यांची संभावना 'मुर्खांचा सरदार' अशी केली होती. मध्य प्रदेश निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मोदी यांच्या या टीकेवर संतापणारे राहुल तशीच टीका करत असतील, तर त्यांनी तरी मोदी यांच्याविषय अपशब्द का वापरला, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. त्यामुळे या दोघांनीही प्रचाराची पातळी खालच्या पातळीवर आणली, ही वस्तुस्थिती आहे. मोदी यांच्यासह भाजपचे नेते राहुल यांची 'पप्पू' अशी हेटाळणी करीत होते. मोदी आणि भाजपच्या त्या टीकेकडे दुर्लक्ष करणारे राहुल आता टीका मनावर घेऊन भाजपच्या नेत्यांना महत्त्व द्यायला लागले, हे कळत नाही. राहुल गांधी मध्य प्रदेशमधील जनतेला भाजपच्या 'वोकल फॉर लोकल'चा नारा समजावून सांगत होते. 'मेड इन मध्य प्रदेश' स्पष्ट करताना त्यांनी 'मेड इन चायना' मोबाईलचा उल्लेख करायला सुरुवात केली; मात्र मोदी यांना हे अजिबात आवडले नाही. राहुल यांना मर्यादित ज्ञान असल्याची टीका मोदी करत होते. कधी कधी राहुल गांधींच्या भूमिकेबद्दल आश्चर्य व्यक्त केले जाते. हे तेच राहुल गांधी आहेत, ज्यांनी २०१७ च्या गुजरात निवडणुकीच्या वेळी काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांनी मोदी यांना 'नीच' म्हटले होते, तेव्हा केवळ माफी मागून विषय न संपवता शिस्तभंगाची कारवाई केली. त्या वेळी ते भारताच्या पंतप्रधानपदाच्या प्रतिष्ठेचा उल्लेख करत होते. त्यावेळी भारताच्या पंतप्रधानपदाच्या प्रतिष्ठेच्या नावाखाली त्यांनी काँग्रेसचा निवडणूक प्रचारही बंद पाडला होता.

खरे तर काँग्रेसच्या प्रचाराला तोंड देण्यासाठी मोदी म्हणाले होते, 'हम छू गुजरात, हम छू विकास.' मोदींच्या आडनावावर 'सारे मोदी चोर का आहेत' असे भाष्य केल्याबद्दल राहुल यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली आणि लोकसभा सदस्यत्व गमवावे लागले; मात्र सर्वोच्च न्यायालयाने शिक्षेला स्थगिती दिल्याने राहुल यांचे संसद सदस्यत्व बहाल करण्यात आले, हा इतिहास जुना नाही. या पार्श्वभूमीवर राहुल यांची ताजी आगपाखड आणि त्याला दिलेली अवमानजनक शब्दांची जोड अनाकलनीय आहे. टीम इंडिया क्रिकेट सामना हरल्यानंतर, संयुक्त जनता दलाचे नेते आणि बिहारच्या नितीशकुमार सरकारमधील मंत्री सुरेंद्र राम यांनी मोदी यांना जबाबदार धरले होते. राजस्थानमधील आरएलपी पक्षाचे नेते हनुमान बेनिवाल यांनीही मोदी यांना जबाबदार धरले. बेनिवाल याआधी भाजपसोबत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत होते. शिवसेनेचे खासदार संजय राऊत हे ही मोदी यांना विश्वचषक सामन्यातील पराभवासाठी जबाबदार धरण्याचा प्रयत्न करत होते. सरदार वल्लभभाई स्टेडियमचे नाव बदलून नरेंद्र मोदी स्टेडियम असे करण्यात आल्याचा आरोप राऊत यांनी केला. 'तिथे वर्ल्ड कप जिंकला तर मोदी स्टेडियममध्ये असल्याने वर्ल्ड कप जिंकला, असा संदेश जाईल. मुंबईच्या वानखेडे स्टेडियममध्ये किंवा कोलकात्याच्या ईडन गार्डनमध्ये अंतिम सामना झाला असता तर भारत क्रिकेटचा विश्वविजेता होऊ शकला असता', असे तारे त्यांनी तोडले.

नेत्यांची ही टीका पाहिल्यास भारतीय क्रिकेटपटूंऐवजी जणू मोदी हेच सामना खेळत होते, असे या नेत्यांना वाटते की काय, असा प्रश्न उपस्थित झाला. सोनिया गांधी यांनी गुजरात निवडणुकीदरम्यान मोदी यांना 'मौत का सौदागर' म्हटल्यानंतर काँग्रेस त्या निवडणुकीत हरली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे, २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी, काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांनी मोदींना चहावाला म्हटले होते. त्यानंतर भाजपनेच 'चाय पे चर्चा' इव्हेंट करून अय्यर यांच्या टीकेला उत्तर दिले होते. मोदी यांनी स्वतःला चायवाला म्हणून घेत लोकांनी मनापासून मते ओढली. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीतही असाच प्रकार पहायला मिळाला. राहुल संपूर्ण निवडणुकीत 'चौकीदार चोर है' असा नारा देत राहिले. राहुल यांना प्रत्युत्तर देताना मोदी यांनी 'सोशल मीडिया'वर त्यांच्या नावापुढे 'चौकीदार' हा शब्द जोडला आणि निवडणूक जिंकल्यानंतरच तो काढून टाकला. या पराभवाची जबाबदारी स्वीकारत राहुल यांनी काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. २०१५ च्या बिहार निवडणुकीत बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या 'डीएनए'मध्ये दोष असल्याचे विधान मोदी यांना महागात पडले होते. मोदी आणि शहा यांच्या विविध प्रयत्नांना न जुमानता भाजपला पराभवाला सामोरे जावे लागले. त्याआधी दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'आप'चे नेते अरविंद केजरीवाल यांच्या गोत्रावर प्रश्न उपस्थित केल्यानंतर भाजपला पराभवाला सामोरे जावे लागले. यामुळे नेत्यांना आपल्या वक्तव्याचे परिणाम कळत नाहीत का, असा प्रश्न निर्माण होतो. का मग अशा वक्तव्यांचेही चाहते असल्याने सवंग लोकप्रियतेसाठी अश्लाघ्य विशेषणे आणि शिव्या वापरल्या जातात, असा प्रश्न पडतो.

आजकाल

जाती-जातींचा नव्हे, एकाच जात्यातला समाज

नीरज हातेकर

जरांगे पाटील हा माणूस प्रामाणिपणे आणि समाजाविषयी तळमळ असलेला असावा असं मला नक्की वाटतंय. त्यांची जवळजवळ सगळी भाषणे मी ऐकतो आहे. पण एक प्रश्न. सरकारकडे हजारो संख्येने पदे रिक्त आहेत. शिवाय अनेक नवीन पदे, सरकारी नोकऱ्या निर्माण करणे आवश्यक आहे.. साधा हिशेब बघुया. व्हिएतनाम मध्ये सरकारी क्षेत्रात नोकरीला असलेल्या लोकांचे लोकसंख्येशी प्रमाण ७.६ टक्के आहे. ब्राझीलमध्ये १२.१ टक्के आहे. चीनमध्ये हे प्रमाण २८ टक्के आहे. जपानमध्ये ७.७टक्के आहे. भारतात हे प्रमाण फक्त ३.८ टक्के आहे

लोकसंख्येच्या प्रमाणात सार्वजानिक क्षेत्रात कमी मनुष्यबळ असण्यात भारत जगात फक्त बांगलादेशच्या खाली आहे. ह्याचा सरळ सरळ परिणाम नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सेवांवर होतो. भारतीय राज्यसंस्थेला आता विकासाच्या अर्थशास्त्रात फ्लेलिंग स्टेट असे संबोधन निर्माण झाले आहे. म्हणजे काय तर वरच्या पातळीवर अत्यंत सक्षम दिल्लीतील आयएएस अधिकारी वगैरे) पण जसे खाली खाली जात जाऊ तसे सार्वजानिक सुविधा, सेवा हया नागरिकापर्यंत पोहचवण्यात अक्षम असलेली शासन संस्था. शासनाची वरची पातळी खालच्या व्यवस्थेला नीट नियंत्रित करु शकत नाही. वरून धोरणे ठरतात पण खाली नीट अंमलबजावणी होत नाही. म्हणून भारत सरकार चंद्रावर यान पाठवू शकते पण रस्त्यावरील खड्डे बुजवणयाचे काम नीट करू शकत नाही. मूळ मुद्दा शासनाच्या सर्वात खालच्या पातळीला अधिक सक्षम करायचा आहे. त्यांना पुरेसे मनुष्यबळ देणे हा त्यातला खुप महत्त्वाचा भाग.

पोलिस , शाळा, इस्पितळे, सरकारी कार्यालये, ह्या सगळ्यात भरतीची आवश्यकता आहे. सध्या जे कंत्राटीकरण सुरु आहे ते सुद्धा थांबले पाहिजे. मुलभूत सेवा पुरविणे आपल्याला जमत नाही हे लक्षात आले की शासन त्या सेवा करुन टाकते. कंत्राटी शिक्षक, कंत्राटी डॉक्टर, कंत्राटी सैनिक. पण हे चुकीचे आहे. ही माणसं शासकीय नोकरीतील असली पाहिजेत. पण सध्या सरकार भरतीच करत नाहीये..सरकारी भरती मोठया प्रमाणावर झाल्याशिवाय आरक्षण मिळाले तरी त्याचा समाजाला फायदा होणार नाही. पण जरांगे पाटील ही मागणी कधीच करत नाहीत. इतकं झाले आहे. त्या दबावाखाली सरकार भरती करायला भाग पडू शकते.. भरती झाली तर मराठा तरुणांना तरुणींना फायदा होईलच की. शिवाय हा विषय तर पूर्णपणे सरकारच्या अखत्यारीत आहे. त्याला कोर्ट वगैरे भानगड नाही. आरक्षण आणि भरती ह्या मागण्या जोडीनं करता येतील. तरीसुद्धा त्यांच्या भाषणात हा विषय कधीच नसतो. का?

काल जरांगे पाटील आणि भुजबळ ह्यांच्यातील फैरी ऐकल्या. दुर्दैव आहे. ओबीसी आणि साधारण मराठा एकाच जात्यात भरडले जाताहेत. खरे तर त्याचे प्रश्न सारखेच आहेत. तोट्यातील शेती, शिक्षण, आरोग्य, रोजगार सुविधांची वानवा, हा दोघांचाही प्रश्न आहे. त्यासाठीच त्यानी एकत्रितपणाने भांडले पाहिजे. पण प्रश्न जातीचा, आरक्षणाचा आणि अस्मितेचा झालाय. ह्यातून काहीच हाती लागणार नाहीये. प्रश्न वर्गाचा आहे, पण त्याकडे जातीचा म्हणून पाहिले जाते आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था अडचणीत आली की जातीय समाजात जातीजातीत भांडणे लागतात. मग ती जातीची भांडणे होतात, मूळ प्रश्न तसाच राहतो. मुळात आपण निरनिराळ्या जाती नसुन जात्यात असलेला एकच वर्ग आहे हे समजावून कोणीच सांगत नाहीये दोन्ही समाजाना.

खरे तर आता हे सोडवायला संघ परिवाराने पुढाकार घेतला पाहिजे. एकमेकाशी भांडत बसले तर हिन्दू सक्षम कसे होणार? हिन्दू नावाचा धर्म आहे आणि त्याखाली कोणी कोणत्या जातीचा नसून सगळेच हिन्दू आहेत् हे सिद्ध करायची आणि त्या साठी सगळ्या हिंदूंचा रोजगार, शिक्षण, आरोग्य, शेती वगैरे विषयी प्रश्न सोडवायची ही संधी आहेना? फक्त मुस्लिमांचा द्वेष करूनच, डाव्यांना राष्ट्रद्रोही वगैरे म्हणून, दसऱ्याला भाषणे करूनच हिन्दू सक्षम होणार असे थोडेच आहे ? ते होणें अवघड दिसते आहे. कारण लोकाचे जमिनीवरचे प्रश्न सोडवणे हा हिंदुत्व वादी विचारसरणीचा उद्देशच नाहीये. त्यांची जमिनीवरची कामे सुद्धा हिंदुत्वाच्या विचाराशी माणसे जोडली जावीत म्हणून असतात, त्यांचें प्रश्न सुटावेत, त्यांना माणूस पण लाभावे हा समतावादी विचार तिथे नाही. त्यांना हिन्दूराष्ट्र तयार करायचे आहे. म्हणजे ज्या लोकांना ते हिन्दू समजतात त्यांचें राष्ट्र. पण त्यासाठी सुद्धा हिन्दू - हिंदू तील भांडणे नकोत का सोडवायला?

लोकसंसद

मंदिरांचे पावित्र्य राखायलाच हवे

गेल्या काही महिन्यांपासून मंदिरात प्रवेश करताना आपल्या संस्कृतीला शोभेल असा पोशाख परिधान करावा अशी नियमावली गुजरातमधील द्वारकाधीश मंदिर, हरिद्वारचे दक्ष प्रजापीत मंदिर तसेच चार धामांमधील प्रसिद्ध केदारनाथ मंदिर इत्यादी देशभरातील अनेक नामांकित मंदिरात लागू करण्यात आली आहे. येत्या १ जानेवारीपासून ओडिशाच्या पुरी येथील जगन्नाथ मंदिरात येणाऱ्या भाविकांना वस्त्रसंहिता (ड्रेस कोड) लागू केली जाणार आहे. महाराष्ट्रातील एकूण ११४ मंदिरांमध्ये या आधीच वस्त्रसंहिता लागू करण्यात आली आहे.

नुकताच रत्नागिरी जिह्यातील ४७ मंदिरांच्या विश्वस्तांनी त्यांच्या अखत्यारीतील मंदिरामध्येही वस्त्रसंहिता लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. वस्त्रसंहितेच्या या नियमावलीनुसार असभ्य, उत्तेजक तोकडे कपडे, फाटके जीन्स आणि इतर अशोभनीय वस्त्रे धारण करून येणाऱ्या महिला तसेच पुरुषांना मंदिरात प्रवेश मिळणार नाही.

वास्तविक विविध प्रकारचे कपडे परिधान करणे ही ज्याची त्याची वैयक्तिक बाब असली तरीही मंदिर ही श्रद्धेची आणि पूजाअर्चेची जागा आहे. त्याठिकाणी अबालवृद्धांपासून सर्वचजण देव दर्शनाला येतात. त्यामुळे मंदिराची प्रतिष्ठा आणि पावित्र्य राखणे ही सर्वच भाविकांची जबाबदारी आहे. आपल्या धर्म आणि संस्कृतीच्या जतनासाठीही ते आवश्यक आहे.

-प्रदीप शंकर मोरे

व्हायरल

बिच्चारा पॅट कमिन्स आणि आपला झकास देश

ऑस्ट्रेलियात सिडनी विमानतळावर पोहोचल्यानंतर पॅट कमिन्सचं अत्यंत साधेपणानं स्वागत झालं,(खरंतर काही स्वागतच झालं नाही) त्याचा व्हिडिओ आज दिवसभर विविध समाजमाध्यमांवर फिरतोय. मीम्सचा तर अक्षरशः तुफान पाऊस पडतोय. पण खरोखर पॅट कमिन्स विमानतळावर पोहोचला तेव्हा एक दोन कॅमेरे वगळता ना मिडियाची गर्दी, ना हारतुरे, ना बँडबाजा, ना गाजावाजा, ना चाहते ना चर्चा, ना क्रेझ ना ट्रेंड... काहीही म्हणजे काहीही नाही. विश्वविजेत्या संघाचा कॅप्टन असला तरी पॅट कमीन्स फारच कमनशिबी ठरला या बाबतीत. कारण क्रिकेटला खेळ म्हणून नव्हे तर धर्म म्हणून डोक्यावर घेणाऱ्या देशात तो जन्मला नाही. खेळाडूला खेळाडू म्हणून नाही तर देव म्हणून पुजणाऱ्या देशात त्याचं पालनपोषण झालं नाही. कठोर मेहनतीच्या बळावर सामना जिंकल्यावरही विजयी संघाऐवजी पुढाऱ्यांच्या श्रेयवादाच्या आणि शकुन-अपशकुनाच्या लढाईशी त्याचा काहीही संबंध नाही. पॅट तू खेळाडू नंतर पण आधी मोठ्ठा सेलिब्रिटी आहेस असं त्याच्या मनावर ठासून ठासून बिंबवणाऱ्या गर्दीचा तो भाग नाही. पॅटला आणि त्याच्या टीमला यापैकी कशाचंच भाग्य लाभलं नाही. म्हणून डोळे दिपवणारा विजय मिळवूनही अभागीच आहेत बिच्चारे !

एके ठिकाणी वाचलं की, भारतीय संघाने असा विजय मिळवला असता तर संघाचं आणि रोहीत-विराटचं कितीतरी आदराने स्वागत झालं असतं वगैरे वगैरे. खरोखर पॅट तू भारतात असायला हवा होतास, म्हणजे खेळ आणि खेळाचा 'इव्हेंट' कसा असतो तुला कळलं असतं. आपल्या संघाला जिंकवण्याचं नाही तर करोडो देशवासियांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचं थोतांड आणि त्याचं दडपण काय असतं ते तुला कळलं असतं. कारण क्रिकेट म्हणजे आमच्याकडे खेळ नाहीये, तो तर एक 'राष्ट्रीय सण' आहे. म्हणून तुझ्यासाठी होमहवन, पूजाअर्चा, दुग्धाभिषेक अगदी सारं म्हणजे सारं काही झालं असतं. पण हा, हरला असतास ना तर ते ट्रोलधाडी पण सहन कराव्या लागतात बरं का! तुझ्यासाठी जसा देव पाण्यात ठेवला असता तसा तुझ्यामुळेच पुरूषांनी टीव्हीसुद्धा फोडला असता आणि हो बायकांनी मात्र त्या फोडलेल्या टीव्हीचं खापर पुन्हा तुझ्यावरच फोडलं असतं.. अरे हे इतकंच नाहीये त्यानंतर जे मस्त 'राजकीय वार-पलटवार' 'शकुन-अपशकुन' सुरु होतात ना ते तर फारच इंटरेस्टिंग... कारण काय तर त्या मॅचच्या दिवसात सगळं राजकारण तुझ्यामुळे, तुझ्यासाठी, तुझ्याभोवतीच झालं असतं बघ.. एकदम झक्कास ! बाकी असा आहे आमचा देश.. भोळाभाबडा, बिचारा.. छे, आमच्या देशात तू खेळाडू किंवा क्रिकेटर म्हणून जन्माला आला नाहीस म्हणून तूच रे तूच बिचारा !

निकिता पाटील

जातीला समाज म्हणू नका ....(संविधान दिनानिमित्त) आरक्षण विषयावर सर्व जाती आक्रमक होताना सध्या अनेक जण आपल्या जातीचा उल्लेख आमचा समाज असा करत असतात.आमच्या समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे असे बोलत असतात..

संविधान दिनानिमित्त हे आपण नोंदवू या की जातीला समाज म्हणणे अत्यंत चुकीचे आहे. अनेक शतकांतील समाजसुधारक आणि स्वातंत्र्य आंदोलनाने त्याग व संघर्ष करून आपण टोळीपासून समाजापर्यंत प्रवास केला आहे... सर्व जाती धर्म मिळून जात निरपेक्ष धर्मनिरपेक्ष जो बनतो त्या समूहाला आपण समाज हे नाव दिले आहे. जर जातींनाच आपण समाज म्हणणार असू तर मग सर्व जातींनी मिळून बनलेल्या समाजाला काय नाव द्यायचे हा प्रश्न आहे ? जातीला 'समाज' असे म्हणून जातीच्या संकुचितपणाला प्रतिष्ठा देण्याचा एक सुप्त प्रयत्नही यात असतो. जात ही अत्यंत क्षुद्र व प्रतिगामी गोष्ट आहे व माणसांचा जातीचा चेहरा नसलेला समाज निर्माण करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केलेले आहेत. जातींची बंधने गळून पडतात त्यातून समाज नावाची एकसंघ वाटणारी भावावस्था आपली बनते. तेव्हा जातींचे उल्लेख जात म्हणूनच करून त्याच्या संकुचितपणाचे जाणीव करून द्यायला हवी त्याचे समाज म्हणून अजिबात उदात्तीकरण होता कामा नये.... समाज ही उन्नत स्थिती आहे संविधान दिनानिमित्त ही आपली जबाबदारी आहे. संविधानाने आपल्याला वेगवेगळी संस्थाने, राज्य, जात धर्म ओलांडून एक भारतीय म्हणून ओळख दिली आहे.एकसंघ समाज बनवले आहे. ती आपण टिकवली पाहिजे. हे वस्त्र टिकायला हवे. त्यामुळे जातीचे समाज म्हणून उदात्तीकरण करू नका. माध्यमांनीही जातीचा उल्लेख समाज म्हणून करू नये.

हेरंब कुलकर्णी

प्रेरणा

नेदावें चोरासि चंद्रबळ

करवितां व्रत अर्धें पुण्य लाभे ।
मोडवितां दोघे नरका जाती ।
शुद्धबुद्धि होय दोघां एक मान ।
चोरासवें कोण जिवें राखे ।
आपुलें देऊनी आपुलाचि घात ।
शन करावा थीत जाणोनियां ।
देऊनियां वेच धाडी वाराणसी ।
नेदावें चोरासि चंद्रबळ ।
तुका म्हणे तप तीर्थ व्रत याग ।
भक्ति हे मार्ग मोडूं नये ।

अर्थ

एखाद्या व्यक्तीने दुसऱ्याला एकादशी व्रत करावयास लावणे तर तो अर्ध्या पुण्याचा वाटेकरि होतो, पण व्रत मोडवले गेले की ते दोघेही नरकात जातात .सद्बुद्धि असलेल्या माणसाची संगती केली की मानसंन्नमान मिळतो, चोरांची संगती केली तर शिक्षा मिळते .आपल्या जवाळील सर्वस्व देऊन आपलेच अहित करुण घेऊ नये , आपले हित ओळखावे .सद्बुद्धि असलेल्या माणसाला काशी-वाराणसीला जाण्यास मदत करावी-पण चोराला ज्योतिषाने चंद्रबळ (चोरीची वेळ) सांगू नये .तुकाराम महाराज म्हणतात, तप, तीर्थ, व्रत, यज्ञयाग हे भक्तीमार्ग आहेत. हे कधी सोडु नये .

क्षणिक

चोरीच्या वाहनाचा शोध

पनवेल : कळंबोली वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे चोरीस गेलेल्या दुचाकीचा शोध लागला आहे. कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरीभाऊ बानकर व पो.ह. शिंदे हे स्टील मार्केटमधील रोडच्या तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करून गस्त करीत असताना केडब्ल्यूसीजवळ एक दुचाकी वाहन क्र. एमएच ४६ सीएच ४२११ हे बेवारस स्थितीत लावल्याचे दिसून आले. इ-चलान मशीनव्दारे मूळ मालकास संपर्क केला असता त्यांनी वाहन चोरीला गेल्याचे सांगितले.

टेम्पोच्या धडकेत एक ठार

पनवेल : टेम्पो गाडीने दिलेल्या धडकेत कामोठे वसाहतीमधील एका ३२ वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना कामोठेमध्ये घडल्याचे समोर आले आहे. या अपघातानंतर टेम्पो चालक टेम्पो घेऊन फरार झाला आहे. सुहास महाडिक (३२) राहणार कामोठे सेक्टर ९ असे मृत व्यक्तीचे नाव आहे. सुहास बायको आणि लहान मुलाला काही कामानिमित्ताने खाली आला होता. तो कुटुंबाला घेऊन बाहेर फिरत होता. काम झाल्यानंतर घरी निघाला असता हा अपघात झाला.

८० हजारांची फसवणूक

पेण : बँकेतून बोलत असल्याचे सांगून क्रेडिट कार्ड कन्व्हर्ट तसेच अपडेट करून देतो, असे सांगितले. दरम्यान, ई-मेलद्वारे पाठवलेले लिंक ओपन करण्यास सांगून सायबर चोरट्याने ८० हजार ३९९ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सेक्टर १७, कामोठे येथे राहणारे महेश शामराव चावरे हे आयडीबीआय इंटेक बँकेच्या आयटी डिपार्टमेंट बेलापूर येथे नोकरी करतात. त्यांची फसवणूक करण्यात आली आहे.

खासगी एजंटला अटक

पनवेल : आरटीओ कार्यालयात वाहन परवाना काढण्यासाठी गेलेल्या व्यक्तीकडून अडीच हजार रुपयांची लाच स्वीकारताना खासगी एजंटला रंगेहाथ पकडले. ठाणे लाचलुचपत प्रतिबंध विभागाने कारवाई केली. कळंबोली पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे. भूषण यशवंत कदम (२९) असे या खासगी एजंटचे नाव आहे. लर्निंग लायसन्स २००, पक्के लायसन्स ९०० असे एकूण ११०० रुपये असताना खासगी एजंटने तक्रारदाराकडून अडीच हजार रुपयांची मागणी केली होती.

मोबाईलची चोरी

पनवेल : घराचा दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेऊन चोरट्याने मोबाईल चोरल्याची घटना कळंबोली येथे घडली आहे. याप्रकरणी कळंबोली पोलीस अधिक तपास करत आहेत. सोहेल इस्रार कुरेशी (२२) हा मानखुर्द येथे राहात असून, त्याने १ लाख ९३ हजार रुपये किमतीचा आयफोन १५ प्रो मॅक्स विकत घेतला. तो कळंबोली येथे आपला मित्र इनाम खान याच्या घरी गेला होता. सकाळी उठल्यानंतर त्याला आपला मोबाईल आढळून आला नाही.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२७ नोव्हेंबर

१) श्री. स्नेहल भास्कर आंजर्लेकर
गोंधळपाडा, अलिबाग, २७-११-१९४५

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

सौ. सुष्मा नवीन सलियान, वाढदिवस, अलिबाग

जलजीवन योजनेला वाली कोण?

- निलेश मांदाडकर यांचा सवाल
- जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

। आंबेत । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये जलजीवन मिशन योजनेमार्फत केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून या योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेला भरघोस निधी प्राप्त होत असून, संबंधित ऑनलाईन ठेकेदारांच्या नावे काही ठिकाणी मर्जीचे सबठेकेदार, तर काही ठिकाणी कर्मचारीच ठेकेदार बनले असून, संबंधित अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे सुमार दर्जाचे काम चालू आहे, असा आरोप निलेश मांदाडकर यांनी केला आहे. ही योजना नक्की जनतेसाठी की ठेकेदार, अधिकारी यांच्या उपजीविकेसाठी, असा सवाल श्री. मांदाडकर यांनी केला आहे.

म्हसळा तालुक्यातील सुरई, खरसई, वारळ, खामगाव, तोराडी, आंबेत इतर ठिकाणी जल जीवन मिशन योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेचा कामाचा दर्जा पाहता उपअभियंता आणि ठेकेदार यांच्या सोयीनुसार राबविताना दिसत असल्याचा आरोपही श्री. मांदाडकर यांनी केला आहे. या योजनेची कामे अशाच प्रकारे सुरू राहिल्यास येथील नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ येईल. तरी, रखडलेल्या जलजीवन योजनेची चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या ठेकेदारांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणीसुद्धा श्री. मांदाडकर यांनीकेली आहे.

तरी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य अभियंता यांनी संबंधित योजनेकडे गंभीर्याने लक्ष घालणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. जर वेळीच लक्ष दिले नाही, तर या जलजीवन मिशन योजनेला वाली कोण असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहणार नसल्याचं मत मांदाडकर यांनी केलं आहे.

सदर उपअभियंता यांच्याकडे माहिती घेतली असता सर्वच योजनेवर जाणे शक्य नाही. लाईनआऊट कामाचा दर्जा पाहणे शक्य नसल्याचे उपअभियंता श्री. फुलपगारे यांनी स्पष्ट केले.

शकुंतला पाटील यांचे निधन

। भाकरवड । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील श्रीगाव ग्रामपंचायत हद्दीतील देहेन गावच्या हभप शकुंतला शांताराम पाटील यांचे बुधवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण देहेन परिसरावर शोककळा पसरली. त्यांच्या पार्थिवावर देहेन गावच्या स्मशनभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यावेळी अध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पार्थिवावर संत तुकाराम भजन मंडळ, महिला भजन मंडळ आणि यश आळी नवरात्र उत्सव मंडळ, बाळ गोपाळ मित्र मंडळ यांच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यांचे उत्तरकार्य शुक्रवार, दि १ डिसेंबर रोजी घरच्या स्वरूपात, तर तेरावे सोमवार दि. ४ डिसेंबर रोजी राहत्या घरी होणार आहे. यांच्या पश्चात पती हभप शांताराम पाटील, मुलगा विजय, मुलगी उज्वला, सरोजनी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

सुतारवाडीत तुळशी विवाह उत्साहात

। सुतारवाडी । वार्ताहर ।

सुतारवाडी आणि पंचक्रोशीमध्ये तुळशी विवाह पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी तुळशी वृंदावन आकर्षक पद्धतीने सजविण्यात आले होते. रांगोळी आणि पानाफुलांची सजावट करण्यात आली होती. वधूकडील वऱ्हाडी आणि वराकडील वऱ्हाडी एकत्र आले होते. भटजींच्या उपस्थितीत आणि अनेकांच्या साक्षीने तुळशी विवाह संपन्न झाला. यावेळी उपस्थितांनी पारंपरिक पेहराव करून उपस्थिती दर्शवली.

नवघर येथे विठ्ठल रखुमाई पालखी सोहळा

। उरण । वार्ताहर ।

कार्तिकी एकादशीनिमित्ताने २३ नोव्हेंबर रोजी नवघर येथे विठ्ठल रखुमाई पालखी सोहळा मोठ्या भक्तीभावाने साजरा झाला.

सकाळी ४ वाजता श्रीकृष्ण हरिपाठ मंडळ बेलपाडा चालक हभप गजानन महाराज, हभप रमेश सोनकर, हभप कमलाकर म्हात्रे, हभप मनोहर म्हात्रे यांच्या हस्ते काकड आरती कार्यक्रम संपन्न झाला. ६ वाजता विठ्ठल रखुमाई अभ्यंग अभिषेक व पूजन प्रणय संदीप कडू यांच्या हस्ते, सकाळी ८ वाजता ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदाय नवघर नियोजित रायगड भूषण प्रभाकर महाराज (नवघर) यांची नगर प्रदक्षिणा दिंडी,

सकाळी ११ ते १२ दिंडीचा कार्यक्रम, हभप रामायणा चार्य संजय महाराज (वारदोली) यांचे कीर्तन, दुपारी ३ ते ५ श्री गणेश हनुमान भजन मंडळ (कुंडे गाव) यांचे भजन, सायंकाळी ५ ते ६ संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदाय (नवघर) यांचे हरिपाठ, सायंकाळी ६ ते ८ हनुमान प्रा. भजन मंडळ (नवघर) यांचे भजन, रात्रौ ८ वाजता श्रींची पालखी सोहळा संपन्न झाला. यामध्ये निशांत वाजेकर यांच्याकडून बँडची व्यवस्था, देवांश व नहूस विजय भोईर यांच्याकडून लाईट व मंडप व्यवस्था, दौलत घरत यांजकडून मंदिरात फुलांची सजावट, वरद सुधीर घरत यांजकडून फटाक्यांची आतषबाजी, रोशन भोईर यांच्याकडून पालखी सजावट, हार्दिक भोईर यांच्याकडून १०० किलो गुलाल देण्यात आला. दि. २४ नोव्हेंबर रोजी ९ वाजता रसिकांच्या मनोरंजनार्थ श्रीकांत मुंबईकर यांच्या जल्लोष महाराष्ट्र कार्यक्रमाचे आयोजन शेखर प्रकाश तांडेल यांनी केले होते.

गुरे चोरांच्या मुसक्या आवळल्या

दोन आरोपींना अटक

म्हसळा पोलिसांची कारवाई; १२ बैल आणि टाटा कंपनीचा टेम्पो जप्त

। म्हसळा । वार्ताहर ।

गोवंश जातीच्या प्राण्यांची कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतूक करीत असताना दोन आरोपींच्या मुसक्या म्हसळा पोलिसांनी आवळल्या. या कारवाईदरम्यान १२ खोंड आणि टाटा कंपनीचा टेम्पो जप्त करण्यात आला आहे. गुरेचोरीच्या घटनांमुळे मालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

दरम्यान, म्हसळा पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक सुरेश दिनकर पाळोदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून करण्यात आलेल्या कारवाईत मोबीन अ हसन शेख (३०) रा. कुर्ला आणि मिराज अहमद कुरेशी या दोन आरोपीना अटक केली. यामध्ये ५ ते ७ वर्ष वयाचे काळा, सफेद, तांबड्या रंगाचे १२ खोंड गोवंश जातीचे बैल आणि रु. १२ लाख ५० हजार किमतीचा टाटा कंपनीचा टेंपो क्र.एमएच ०३ डीव्ही ५५१४ असा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. म्हसळा साई चेक पोस्ट येथे हवालदारानी गोरेगावच्या दिशेने भरधाव येणाऱ्या टेपोला अडविण्याचा प्रयत्न करताच पोलीस कर्मचाऱ्याना दोन्ही आरोपीनी धक्काबुक्की आणि दमदाटी दिली. म्हसळा पोलीस ठाण्याचे सपोनी संदीपान सोनावणे यांना गुन्ह्याचे गांभीर्य कळताच त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत स्वामी यांना हकीगत कळविली. हेड कॉ. संतोष चव्हाण, शिर्के, देवरे, घोंगाणे , सुर्यकांत जाधव, मपोशि वर्षा पाटील, हंबीर श्रीवर्धन पीआय रिकामे, दिघी सागरी पीआय राजेंद्र ढेबे घटनास्थळी पोहोचले. या घटनेतील दोन्ही आरोपींना दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाल्याचे तपासी अधिकारी सपोनी संदीपान सोनावणे यांनी सांगितले.

प्रथमेश बापलेकर बेपत्ता

सुतारवाडी : निडी मुरुड येथील रहिवासी प्रथमेश मोहन बापलेकर (१८) सध्या कोलाड येथील गोवे कॉलेजमध्ये डिप्लोमा केमिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होता. तो २० नोव्हेंबरपासून बेपत्ता झाला आहे. याबाबत पोलीस ठाण्यात तो हरविल्याची नोंद करण्यात आली आहे. तरी, या तरुणाबाबत काही माहिती असल्यास नितेश पाटील ९०२८३३९६३८, दिनेश बापलेकर ८१४९६४३२४६ यांच्या संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

एकादशीनिमित्त कुर्डूस येथे कार्यक्रम

। भाकरवड । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत कुर्डूस हद्दीतील शिवाजी नगर येथे कार्तिकी एकादशीनिमित्त विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थ अध्यक्ष रवींद्र पिंगळे, सल्लागार रामचंद्र बांधनकर, अभिमन्यू पाटील, मच्छिंद्र पिंगळे, सचिव आत्माराम पाटील, खजिनदार प्रवीण पाटील, पंच कमिटी शंकर पिंगळे, श्याम मिसाळ, ज्ञानेश्वर पाटील, संतोष पाटील, राजेंद्र पिंगळे, बबन पाटील, अरुण पाटील, संगीता पिंगळे, विजया धरणे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी ध्वज उभारून मंदिरात स्थापना केलेल्या विठ्ठल रखुमाबई यांच्या मूर्तीस अभिषेक करून पुष्पहार अर्पण करून विधिवत रूपाने पूजन करण्यात आले. यावेळी मंडळाच्या वतीने समाजोपयोगी सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक कार्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचे ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार, शाल देऊन गौरविण्यात आले.

दरम्यान, मरी आई प्रासादिक सेवा भजन मंडळ भाकरवड येथील बुवा राजेंद्र पाटील, मनोदय पाटील, देवेंद्र पाटील, मृदुंगमनी जीवन पाटील आणि सहकारी यांनी हरिजागर करून भजनसेवा केली.

स्वच्छता अभियानांतर्गत साफसफाई

। उरण । वार्ताहर ।

उरण नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरात दि. २४ नोव्हेंबर रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात उरण शहरातील तहसील कार्यालय परिसर, मशीद मोहल्ला, महात्मा गांधी पुतळा ते हरीपांडव पथपर्यंत परिसरात स्वच्छता अभियान घेण्यात आले. या अभियानात एकूण तीन टन कचरा उचलण्यात आला.

उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, लेखापाल सुरेश पोसतांडेल, बांधकाम अभियंता झुंबर माने, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, प्रशासकीय अधिकारी अनिल जगधानी, कर निरीक्षक संजय डापसे, तसेच सफाई कर्मचारी/मुकादम यांच्या श्रमदानातून स्वच्छता अभियान पार पडले. तसेच उरण नगर परिषद शाळा क्र १,२,३ चे शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनी सदर अभियानात भाग घेऊन श्रमदान केले. या अभियानामुळे नगर परिषद हद्दीतील परिसर स्वच्छ व सुंदर झाला. या अभियानाचे कौतुक करत नागरिकांनी नगरपरिषदेचे आभार मानले.

श्रीवर्धन येथील स्मशानभूमीची दुरवस्था

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन येथील समुद्रकिनारी असणाऱ्या स्मशानभूमीत मठाचा गवंड येथे एकाच ठिकाणी गॅस शवदाहिनी बसविण्यात आली असून, त्यामुळे ग्रामस्थांची मोठी सोयच झाली आहे. नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत ८७,७७,४७०/- रुपये अंदाजपत्रकीय खर्चाच्या या गॅस शवदाहिनीचा लोकार्पण सोहळा खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते दि.१६ जुलै २२ रोजी झाला होता. परंतु, या स्मशानभूमीची सध्या काहीशी दुर्दशा झाली आहे.

दक्षिणेकडील संरक्षक भिंतीला मोठे भगदाड पडले आहे. तसेच स्मशानभूमीच्या आतील बाजूस असणारे सुरुचे एक मोठे झाड पूर्णपणे सुकून गेले आहे. जोरदार वाऱ्याने हे झाड पडल्यास

बाजूच्या संरक्षक भिंतीचे मोठेच नुकसान होईल. या स्मशानभूमीच्या आवारात नळाच्या किंवा अन्य पाण्याची कोणतीही सोय नाही. त्यामुळे शेजारच्या एखाद्या नागरिकाकडून पाणी आणावे लागते. या स्मशानभूमीच्या समोर लोकांना बसण्यासाठी असलेली कौलारू शेडही मोडकळीस आलेली असल्यामुळे अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना उन्हात ताटकळत उभे राहावे लागते. तरी, याकडे श्रीवर्धन नगरपरिषदेने लक्ष घालून तेथील उणीवा दूर कराव्यात, अशी नागरिकांची मागणी आहे.

चौक येथील तुपगाव कॉर्नर धोकादायक

। रसायनी । वार्ताहर ।

चौक बाजारपेठेमधून तुपगावकडे जाणारा रस्ता म्हणजे तुपगाव कॉर्नर धोकादायक असून, येथे भाजीपाला विक्रीस बसणाऱ्यांच्या जिवावर बेतू शकतो. रोजच अशी स्थिती होत असली तरी त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, असा आरोप येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

खालापूर तालुक्यातील चौक ही मोठी बाजारपेठ असून, चाळीस गावातून लोक याठिकाणी खरेदी-विक्रीसाठी ये-जा करीत असतात. या परिसरात गावठी भाजीपाला मोठ्या प्रमाणावर पिकवला जातो. त्याचप्रमाणे त्याची विक्रीदेखील जास्त प्रमाणत होत असते. गावठी भाजीपाला विक्री करणारे सामान्य शेतकरी व आदिवासी महिला असतात. यांना भाजीपाला विक्रीसाठी जागा उपलब्ध नसल्याने रस्त्याच्या दुतर्फा बसतात. तुपगाव कॉर्नर हा परिसराला जोडणारा भाग आहे, त्यामुळे येथे जास्त लोक विक्रीस बसतात. चौक गावातून तुपगावकडे व तुपगाव येथून चौकमार्गे पनवेल-खोपोलीकडे जाणाऱ्या गाड्या अनधिकृत बांधकाम, विद्युत खांब, बेशिस्त दुचाकी पार्किंग, रिक्षा स्टँडला जागा नसल्याने त्यांची स्थिती वाईट अशा अनेक कारणांनी कधीतरी ते भाजी विक्रेत्यांच्या जिवावर बेतले जाऊ शकते, हे नेहमीच चित्र दिसत आहे. वेळीच उपाय न झाल्यास कुणाला तरी आपला जीव गमवावा लागेल, तरच प्रशासनाला जाग येईल, अशी चर्चा नागरिकांतून करण्यात येत आहे.

रेवदंडा किनाऱ्याची बकाल अवस्था

बियर, दारूच्या रिकाम्या बाटल्यांचा खच

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या सुट्टीत रेवदंडा समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांची सध्या मोठी असून, किनारा पर्यटकांनी फुलून गेला आहे. परंतु, किनाऱ्यावर कचऱ्याचे ढीग, दारु आणि बियरच्या बाटल्यांचा खच असे चित्र सर्रासपणे दिसून येते. त्यामुळे किनाऱ्याची अवस्था बकाल झाली आहे. कागद, प्लास्टिक कचऱ्याचा ढीग अन् दारुच्या बाटल्यामुळे येथील परिसर गलिच्छ दिसून येत आहे.

मागील काही दिवसांपासून रेवदंडा किनारी बियर व दारूच्या रिकाम्या बाटल्यांचा खच नित्याने पडत आहे. दरम्यान, फुटलेल्या बाटल्या धोकादायक ठरून येथून जा-ये करणारे जखमी होण्याचे शक्यता आहे. मात्र, आगरकोट किल्ल्यातील बागायतीत बिच टेंटमधील पर्यटक हे रात्री-अपरात्री किनाऱ्यावर येऊन दारू पित असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत. बिच टेंन्टच्या अवकृपेने चौपाटीचे विद्रुपीकरण होत असून, स्थानिक ग्रामस्थांसह पर्यटक, पै-पाहुण्यांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

रेवदंडा समुद्रकिनाऱ्यालगत आगरकोट किल्ला मालकी बागायत परिसरात बिच टेंन्ट सुविधा काहीनी भाडे तत्त्वावर सुरू केली आहे. समुद्रकिनारी अतिक्रमण करून या टेंन्टची उभारणी केली आहे. याठिकाणी येणारे समुद्रप्रेमी, पर्यटक मंडळी किनाऱ्यावर दारू पिऊन रात्रभर धिंगाना घालत फिरत असतात. दारुच्या बाटल्या इतरस्त्र फेकून समुद्रकिनारा विद्रुप बनवून टाकतात, असा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. या फुटलेल्या बाटल्यांच्या काचा येथून पायी जा-ये करणाऱ्यांना इजा होऊन जखमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानिकांना समुद्र चौपाटीवर फिरणे नकोसे झाले आहे.

तरी, रेवदंडा आगरकोट किल्ला बागायतीमध्ये मालकीच्या जागेत असलेल्या बिच टेंन्टवर संबंधितांना सक्त ताकीद देण्यात यावी, तसेच रात्री-अपरात्री समुद्रकिनारी फिरण्यास बंदी करावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करत आहेत.

क्षणचित्रे

दीड लाख रुपयांची चोरी

पनवेल : ज्येष्ठ नागरिकाच्या बॅगेतील दीड लाख रुपये दोन अनोळखी चोरट्यांनी चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नौदल विभागातून सेवानिवृत्त झालेले भीष्मकुमार द्विवेदी हे से. ३५ खारघर येथे राहतात. ते बँकेत पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यानंतर पैसे घेऊन ते डिफेन्स कॅन्टीनकडे जात असताना सेक्टर १३ येथे मोटारसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी द्विवेदी यांच्या हातातील दीड लाख रुपयांची रोख रक्कम व इतर कागदपत्र असलेली बॅग खेचून नेली.

कारच्या धडकेत दोघे जखमी

पनवेल : येथील निसर्ग ढाबा येथे कारने मोटरसायकलला दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी कारचालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजीव मिश्रा हे देवद येथे राहात असून, ते मोरबे येथे यशवंत यादव यांच्यासोबत एका कामासाठी गेले होते. मोरबे गावातील काम आटोपून ते देवद येथील घरी येत होते. निसर्ग ढाबा, हरिग्राम येथे आले असता एका भरधाव कारने त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली.

गावदेवीच्या दानपेटीची चोरी

पनवेल : तालुक्यातील मंदिरांमधील दानपेटी चोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागले आहे. सुकापूर-चिंचपाडापाठोपाठ आता वाजे येथील गावदेवी मंदिरातील दानपेटी चोरट्याने चोरून नेली आहे. दानपेटी घेऊन चोर बाहेर निघून गेला. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे. चोरट्याने तोंडाला मास्क लावलेला होता. मंदिरातील दानपेटी चोरीमुळे नागरिक भयभीत झाले आहेत. वारंवार मंदिरात होणाऱ्या चोऱ्यांमुळे नागरिकांकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

पोलिसांनी घेतली शपथ

कर्जत : तालुक्यात विविध सामाजिक संस्था, संघटना आदी ठिकाणी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान, कर्जत पोलीस ठाण्यातही भारतीय संविधान दिन साजरा झाला. पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी संविधान शपथ वाचन केले. यावेळी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना संविधाने महत्त्व, संविधानामुळे आपल्याला मिळालेले अधिकार याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांनी शपथ घेतली.

मोफत मसाज सेवा

चिरनेर : उरण तालुक्यातील कडापे गावातील प्रा. प्रशांत म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्ताने गरजू नागरिकांना कांस्य थाळी मसाज सेंटर सारडे विकास मंचातर्फे पायाची मसाज सेवा मोफत देण्यात आली. आवरे, गोवठणे, पाले, पिरकोन, बेलपाडा, द्रोणागिरी, जसाई, कोप्रोली, कडापे येथील नागरिकांनी या मसाज सेवेचा लाभ घेतला. यावेळी नागरिकांसाठी ड्राय फ्रुट्स, ज्यूसची सोय करण्यात होती. यासाठी राकेश पाटील, सुयश गावंड, नागेंद्र म्हात्रे, हिराचंद पाटील यांचे सहकार्य लाभले.

पारंपरिक मासेमारी धोक्यात

■ खाडी प्रदूषणामुळे व्यवसायावर परिणाम ■ मच्छिमारांवर उपासमारीची वेळ

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण-पनवेलच्या विविध खाड्या, किनारपट्टीवरील जलप्रदूषण वाढले आहे. तर, दुसरीकडे मातीचा भराव करून खाडीमुख बुजविण्यात येत आहेत. खाडीतील वाढते जलप्रदूषण आणि भराव यामुळे किनाऱ्याच्या परिसरात आढळणाऱ्या विविध मासळीच्या काही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या मच्छिमारांना याचा आर्थिक फटका बसला आहे. या मत्स्यदुष्काळाने उपासमारीची वेळ आली आहे. उरण-पनवेल परिसरातील करंजा, मोरा, हनुमान कोळीवाडा, पाणजे, कुंडेगाव खोपटा, वशेणी, न्हावा, गव्हाण, कोपर, उलवा आदी परिसर पारंपरिक मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे. या किनाऱ्यावर कोळी समाजाची मोठी वस्ती आहे.

पारंपरिक पद्धतीने सुरु असलेला मासेमारीचा व्यवसायच येथील मच्छिमारांचे रोजी रोटीचे साधन आहे. या पद्धतीमध्ये बदल करून या व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून व्यवसायात वाढ केली आहे.

परंतु, गेल्या काही वर्षात या व्यवसायात अनेक अडचणी उद्‌भवू लागल्या आहेत. वाढत्या जलप्रदूषणामुळे या व्यवसायावर फार मोठे संकट आले आहे. त्यामुळे किनाऱ्यालगत आणि खाडीत मासळीचे प्रमाण घटले आहे. सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन या संस्थेने मुंबई परिसरातील व किनारपट्टीच्या परिसरात मत्स्यव्यवसायावर संशोधन केले. या संस्थेच्या अहवालानुसार मुंबई, रायगडच्या सागरी व खाडी परिसरात १२५ मासळीच्या जाती आढळून येत होत्या. त्यापैकी आता फक्त ७८ जाती शिल्लक आहेत.

खाडी, किनारपट्टीवर मिळणारे बोंबील, ढोमी, मांदेली, घोळ, कलेट, कोलंबी, शिंगाली, चिंबोरी, खुबे, कालवे, निवट्या, कोळीम, बोईट, पाखट, बाकस, हेकरु, तांब, मुशी, रावस, जिताडी, शेवंड, पाला, करपाल, टायनी-कापसी कोळंबी इत्यादी मासळीचे प्रकार आढळतात. हेच मासे कोळी बांधवांना दैनंदिन रोजीरोटी मिळवून देतात.

पनवेल कोळीवाडा, गव्हाण, कोपर हे क्षेत्र नवी मुंबई विमानतळबाधित झाले आहे. तर, उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा, पाणजे, मोरा, घारापुरी, न्हावा, गव्हाण हा भाग जेएनपीटी बंदर, शिवडी-न्हावा सि-लिंक या प्रकल्पामुळे बाधित झाला आहे.

करंजा, केगाव, खोपटा, आवरा, वशेणी आदी समुद्रकिनारा, खाडी परिसर ओएनजीसी आणि जेएसडब्ल्यू आणि परिसरात उभारण्यात आलेल्या कंटेनर यार्ड आणि बंदरांमुळे बाधित झाला आहे. तिसरी मुंबई घोषित केल्याने या भागात येणारे नवे प्रकल्प, कोस्टल रोड, बंदरे, जेट्टी आदी प्रकल्प उभारण्याच्या नावाखाली खारफुटीची बेसुमार कत्तल केली जात आहे. दूषित रसायनमिश्रित सांडपाणी समुद्र, खाड्यांमध्ये सोडण्यात येत आहे. कोणतीही प्रक्रिया न करता सोडण्यात येणाऱ्या रसायनमिश्रित दूषित सांडपाण्यामुळे जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या वाढत्या प्रदूषणामुळे या क्षेत्रांतील भागातून विविध मासळीच्या जाती नष्ट होत चालल्या आहेत. यामुळे माशांचे प्रमाण कमी झाले आहे. मासेच मिळेनासे झाल्याने येथील पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छिमारांवर उपासमारीचे संकट आले असल्याची माहिती कोकण किनारा मच्छिमार संघटनेचे जयवंत तांडेल यांनी दिली.

अशी अनेक संकटं, समस्या पारंपरिक पद्धतीनेमासेमारीकरणाऱ्यास्थानिकमच्छिमारांना भेडसावत आहेत. बंदराच्या वाढत्या विकास आणि सागरी प्रदूषणामुळे स्थानिक मच्छिमार मत्स्यदुष्काळात सापडलेले आहेत.विकासाच्या नावाखाली होणाऱ्या जलप्रदूषणाचीच अधिक भीती स्थानिक या मच्छिमारांना वाटू लागली आहे.वाढत्या जलप्रदूषणामुळे मासेमारी क्षेत्र तसेच मासळीच्या प्रजननाची ठिकाणे नष्ट झाली आहेत. तसेच चिखलाचे थर वाढले आहेत आदी कारणे आणि जलप्रदूषणामुळे पारंपरिक मासेमारी धोक्यात आली असल्याची माहिती मच्छिमारांनी दिली आहे.

मांडला फाट्यावर गतिरोधक बसवा

■ वाहनचालक, स्थानिकांची मागणी

। मुरूड जंजिरा । वार्ताहर।

मुरूड ते अलिबाग रस्त्यावरील मांडला गावाच्या फाट्यावर पुलानजीक, भोईघर फाट्याच्या चौकात नित्य होणारे छोटे-मोठे अपघात रोखण्यासाठी किमान दोन तरी गतिरोधक बसविण्याची गरज आहे. ते त्वरित बसवण्याची मागणी वाहन चालक, स्थानिक ग्रामस्थ व प्रवाशांनी केली आहे. हा मार्ग पुढे काशीद बीच, नांदगाव, मुरूडकडे जातो.

मुरुडहून अलिबागकडे जातांना बोर्ली पुलाच्या अलीकडे मांडला गावाकडे जाण्यासाठी एकेरी मार्गाच्या मांडला फाट्यावरुन जावे लागते. सदरचा मार्ग हा वळणाचा असून, भोईघर गावाकडून व बोर्लीकडून दुचाकी, चारचाकी वेगाने येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना विशेषतःएसटी बसचालकांना अक्षरशः अडथळ्यांचा ठरत आहे. येथे एका खासगी बंगल्याच्या मालकाने रस्त्यालगत बांधलेल्या संरक्षक भिंतीमुळे व येथे वाढलेल्या झाडीमुळे भोईघरहून येणारे वाहन दृष्टिपथात येत नाही. वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी कुठेही पोलीस उपलब्ध नाहीत. हा भाग रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येतो.

एकाच वेळी दोन वाहने आल्यास चालकांना तारेवरची कसरत करावी लागते. त्यात वेगावर नियंत्रण नसलेले, धूम स्टाईलने दुचाकी चालविणाऱ्यांमुळेही येथे अपघात होत आहेत. येथील मांडला व भोईघर या दोन फाट्यांवर दोन गतिरोधक बसविल्यास येथील अपघात टाळू शकतात.

शनिवारी येथे एका एसटी बस व दुचाकीचा मोठा अपघात टळला. काशिद व मुरुडला भेट देणाऱ्या पर्यटकांत दिवसेंदिवस वाढ होत असताना त्यांना चांगले व सुरक्षित रस्ते देणे गरजेचे आहे.

पालीवाला महाविद्यालयात संविधान दिन

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित भारतीय संविधान दिवस २६ नोव्हेंबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सर्वप्रथम भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. डॉ. अंजली पुराणिक यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व सांगितले. प्रमुख व्याख्यात्या ॲड. स्वरदा साने यांनी भारतीय संविधानाविषयी माहिती सांगत असताना डॉ. बाबासाहेबांचे कार्य, संविधानपूर्व कालखंड, कलमे, परिशिष्ट, रचना संविधानातील भाग,

विचार, अभिव्यक्ती, मसुदा समिती, समाजातील एकात्मता याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सुधाकर लहूपचांग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. स्नेहल बेलवलकर, प्रा. ज्ञानेश्वर मुंढे, रसायन शास्त्र विभाग प्रमुख डॉ. अंजली पुराणिक , प्रा. कृष्णा जांभेकर, सर्व विभागांचे विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, महाविद्यालय कर्मचारी यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहल बेलवलकर व आभार प्रदर्शन प्रा. ज्ञानेश्वर मुंढे यांनी केले.

सर्पमित्राने दिले धामणाला जीवदान

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड-एकदरा गावातील पेंटर तथा सर्पमित्र महेश साळुंखे यांनी मुरुड-कुंभार वाड्यातील दत्तात्रेय राजपुरकर यांच्या घराच्या मागच्या बाजूस असणाऱ्या शेतात धामण जातीच्या सापाला पकडून जीवदान दिले.

दत्तात्रेय राजपुरकर सकाळच्या वेळी आपल्या मागील शेतात काम करत असताना लांबसडक असणारा साप त्यांच्या निदर्शनात आला. साप बघितल्यावर घाबरलेल्या राजपुरकर यांनी शेजाऱ्यांना बोलावून घेतले. दरम्यान, वनविभागाला भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात आले. शेतात लावलेल्या जाळ्यात तो साप अडकल्याने सुटण्यासाठी धडपड करीत होता. वनपाल विजय कोजबे यांनी सर्पमित्र महेश साळुंखे यांना घटनास्थळी बोलवून धामण जातीच्या सापला सुखरूप बाहेर काढून वनक्षेत्रात सुखरुप सोडून देण्यात आले.

नांदगाव हायस्कूलमध्ये संविधानाचे वाचन

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूल येथे रविवारी संविधान दिन मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. तसेच उपस्थित मान्यवर यांनी पुष्पवृष्टी करून डॉ. आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

यावेळी या शाळेच्या पर्यवेक्षिका अर्चना खोत यांनी संविधानाचे वाचन केले. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशहितासाठी केलेल्या कार्याबाबत विशेष माहिती देण्यात आली. यावेळी २६/११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले जवान, पोलीस अधिकारी व निष्पाप नागरिकांसुद्धा श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- रबर (नायलॉन) स्टॅम्प्स, वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. रेस्टॉरंट व किचन मॅनेजर २. ऑल राऊंडर कूक ३.नाश्ता बनवणारा कूक ४. हेल्पर कूक ५.नाईट शिफ्ट हाऊस किपींग २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा (व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५ /७८७५८६६५५५
- लग्नासाठी वर पाहिजे आहे. वधूचे वय :- २२, ठिकाण : अलिबाग, मोबाईल नं. ७५०७९०९४३१, बायोडाटा या मोबाईल नंबरवर पाठवणे.
- पत्रावळी पेपर डीश मशीन विक्री आमच्याकडे पत्रावळी, पेपर डिश, मशीन मिळतील. तसेच सिल्व्हर व ग्रीन पेपर मिळेल. मुद्रा इंटरप्रायझेस पेण संपर्क : ८२३७४२४१२४
- श्री.सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी, धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी मुलगी पाहिजे. पात्रता : दहावी/बारावी पास कॉम्प्युटर येणे आवश्यक संपर्क:- ९९७०५०९४४०
- विद्यानगर परिसरात एक 1BHK व एक 2BHK प्लॉट त्वरीत विकणे आहे. संपर्क विरेंद्र पवार - ९४२२६९००५८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

संरक्षण भिंतीसाठी काढलेली माती जागेवरच

नेरळच्या मातोश्रीनगरला पावसाचा बसणार फटका

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान-नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावरच मातोश्रीनगर येथे रस्त्यावर असलेल्या नाल्याला पाटबंधारे विभागाकडून संरक्षण भिंत बांधली जात आहे. या भिंतीमुळे नाल्याच्या आजूबाजूला असलेल्या रहिवासी घरांचे पावसाच्या पाण्यापासून संरक्षण होणार आहे, असे सांगण्यात येते. मात्र, या नाल्याचे एका बाजूने बांधल्या जात असलेल्या संरक्षण भिंतीचे बांधकाम होत असताना काढण्यात आलेली माती नाल्यात टाकण्यात आल्याने ती पावसाच्या पाण्याला अडथळा ठरु शकते. याकडे संबंधित अधिकाऱ्यांकडून हलगर्जी दाखवली असल्याचे स्थानिक बोलत आहेत.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील मातोश्रीनगर भागातून येणारे पावसाचे पाणी मागील काही वर्षे या परिसरातील रहिवाशांचे घरात घुसत आहे. त्यात तेथील नाल्याच्या बाजूला सातत्याने अनधिकृत बांधकामे केली जात आहेत. त्यामुळे नाल्याची रुंदी दरवर्षी कमी होत चालली आहे. त्यात या नाल्याच्या अगदी बाजूने कळंब राज्यमार्ग रस्ता आहे, त्यामुळे वाहने रस्त्याच्या खाली जाऊन नाल्यात कोसळण्याचीदेखील भीती आहे. ते लक्षात घेऊन स्थानिक ग्रामपंचायत सदस्य जयश्री मानकामे यांनी रस्त्याचे आणि नाल्याचे संरक्षण करण्यासाठी संरक्षण भिंतीचे काम मंजूर करावे यासाठी आ. महेंद्र थोरवे यांच्याकडे पाठपुरावा सुरू होता. दरम्यान, याठिकाणी नाल्याच्या कडेला पाटबंधारे विभागाकडून संरक्षण भिंत बांधण्याचे काम मंजूर झाले होते. ते काम गेली महिनाभरापासून सुरू आहे. त्या ठिकाणी बांधण्यात येत असलेल्या संरक्षण भिंतीचे काम हे नियमानुसार झालेले नाही, असे स्थानिक बोलत जात आहे.

दुसरीकडे या संरक्षण भिंतीमुळे पावसाळ्यातील पाण्यापासून रक्षण होऊ शकते. पण, या भिंतीचे बांधकाम करण्यासाठी खोदकाम केले गेले आणि तेथून काढलेली माती बाजूला नाल्यात टाकण्यात आली आहे. त्याचा परिणाम या नाल्याची रुंदी अधिक कमी झाली आहे. त्यामुळे पाटबंधारे खात्याने नाल्याची रुंदी वाढविण्यासाठी संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासाठी निधी मंजूर केली आहे. मग नवीन भिंत बांधण्यासाठी खोदकाम करताना काढलेली माती समोरच नाल्यात टाकली आहे. ही माती पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळा ठरणार आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस श्रीराम राणे यांनी पाटबंधारे खात्याने त्या नाल्यात टाकलेली माती काढावी तसेच संपूर्ण नाल्याची साफसफाई करण्यात यावी, अशी सूचना पाटबंधारे खात्याला केली आहे.

माकडांमुळे तळावासीय हैराण

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरातील नागरिक वन्य माकडांमुळे हैराण झाले असून, त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. तळा शहरात अन्नाच्या शोधात ही माकडे मानवी वस्तीकडे वळली असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

ऐतिहासिक तळगड किल्ल्यावर मोठ्या प्रमाणावर असणारी माकडे झाडांवरील फळे खाऊन राहात असत, तसेच तळगड किल्ला पाहण्यास येणारे पर्यटक माकडांना आपल्याकडील खाद्य पदार्थ खाण्यास देत असत. मात्र, काही वर्षांपूर्वी आलेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे गडावरील झाडांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली आहे. तसेच गडावर माकडांसाठी खाद्य पदार्थ घेऊन जाणाऱ्या पर्यटकांची संख्यादेखील मंदावली असल्याने माकडांना खायला खाद्य उरले नाही. परिणामी, अन्नाच्या शोधात या माकडांना मानवी वस्तीत यायची वेळ आली आहे. ही वन्य माकडे पुसाटी व

वडाचीवाडी येथील शेतकऱ्यांच्या शेतीची नासाडी करतात तसेच जोगवाडी, मधली आळी, सोनार आळी,कासार आळी, कुंभार आळी बाजारपेठ आदी गावातील नागरिकांच्या घरात घुसून अन्नाची नासाडी करून साहित्यांचीदेखील नुकसानी करीत आहेत. त्यामुळे येथील रहिवासी पुरते वैतागले आहेत. याबाबत तळा वनविभाग अधिकारी यांच्याकडे संपर्क साधला असता आम्ही यामध्ये काहीही करू शकत नाही. नागरिक माकडांना खायला देतात, त्यामुळे ती वस्त्यांकडे वळली आहेत. नागरिकांनी खायला देणे बंद केले तर ती पुन्हा जंगलाकडे वळतील. त्यामुळे माकडांना खाद्यपदार्थ देऊ नका, अशी भित्तीचित्रे आम्ही महत्त्वाच्या ठिकाणी लावणार आहोत, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

भरघोस उत्पादन, मागणीतही वाढ

कंदमुळे विक्रीतून आदिवासींना हक्काचा रोजगार

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

जंगल व डोंगर रांगांनी वेढलेल्या रायगड जिल्ह्यात सध्या आरोग्यदायी विविध कंदमुळांचे भरघोस उत्पादन मिळत आहे. सध्या सर्वच बाजारपेठेत कणक, करंदे, चाई, आळू, वरा, लोंढी व रताळी आदी कंदमुळांची विक्री आदिवासी बांधव करत आहेत. मागील वर्षीपेक्षा किलोमागे १० ते २० रुपये भाव वाढले आहेत. मात्र, खवय्ये आवर्जून खरेदी करतात. आदिवासींना यातून रोजगारदेखील मिळत आहे.

> जिल्ह्यातील आदिवासी बांधव आपल्या घराशेजारी व डोंगरावर कंदमुळे लावतात. या कंदमुळे विक्रीतून आदिवासींना हक्काचा रोजगार मिळतो. परिणामी, त्यांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात थांबते. या सर्व मालाला आणखी चांगली किंमत व मोठी बाजारपेठ मिळाली पाहिजे. वाहतुकीची स्वस्त व्यवस्था केली पाहिजे. यातून आदिवासींचे जीवनमान अधिक चांगले उंचावू शकेल.
> - शरद गोळे, प्रयोगशील शेतकरी, शिळोशी, सुधागड

आदिवासीवाड्यांवर त्यामध्ये बहुतांशठाकूरवाड्यांवरघराशेजारील परसबागेत, माळरानावर व डोंगरावर कंदमुळांचे उत्पादन घेतले जाते. मागील वर्षी ४० ते ५० रुपये किलोने मिळणारे कणक, करंदे, चाई, वारा, आळू, लोंढी, रताळी आदी कंदमुळे यंदा ६० ते ७० रुपये किलोने मिळत आहेत. आताच हंगाम सुरू झाल्याने किमती वाढल्या आहेत. मात्र, काही दिवसांनी या किमती कमी होतील, असे लक्ष्मी लेंडी या कंदमूळ विक्रेत्या महिलेने सांगितले. तर, मध्य प्रदेशमधून जिल्ह्यात येणारे

आरोग्यवर्धक व चविष्ट

कंदमुळे साधारण चवीला गोड व रुचकर असतात. या कंदमुळांचे आयुर्वेदिक उपयोगही आहेत. यामुळे रक्तातील साखरेची पातळीही नियंत्रित राहते. शरीरात रक्ताची वाढ होते. शरीरातील कार्यशक्ती वाढते. विविध व्हिटॅमिन्स व कर्बोदके असतात. शरीराला ऊर्जा मिळते. अशा विविध दृष्टीने ही कंदमुळे गुणकारी आहेत. बहुतांश जण ही कंदमुळे उकडून, तर काही जण भाजून खातात. काहीजण याची भाजीदेखील बनवून खातात.

ॲड. चंद्रहास खेडकर म्हणाले की, या हंगामात मिळणारे हे आरोग्यवर्धक विविध कंदमुळे आवर्जून खातो. शिवाय, येथून घरी घेऊन जातो. नातेवाईकांनादेखील भेट म्हणून देतो.

गंगाराम माने यांचे निधन

। नागोठणे । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील खांब येथील माजी सैनिक, निवृत्त सुबेदार गंगाराम पांडुरंग माने (६९) यांचे शुक्रवार, दि.२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. रोहा तालुका भाजपाचे खांब विभागातील युवा कार्यकर्ते कल्पेश माने यांचे ते वडील होत. खांब येथील वैकुंठ स्मशानभूमीत सायं. ६ वाजण्याच्या सुमारास त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी खांब पंचक्रोशीसह रोहा तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी अनिता यांच्यासह सुरेखा पवार, स्मिता मांजरेकर, कल्पिता सांळुखे या तीन विवाहित मुली तसेच कल्पेश व रुपेश ही दोन मुले, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. गंगाराम माने यांचे दशक्रिया विधी रविवार दि.३ डिसेंबर रोजी व उत्तर कार्य विधी मंगळवार दि.५ डिसेंबर रोजी खांब येथे होणार आहे.

पेमास्टर उद्यान विकासाच्या प्रतीक्षेत

। माथेरान । वार्ताहर ।

सर्वात उंच ठिकाणावर असणारे माथेरानमधील पेमास्टर उद्यान आजही विकासाच्या प्रतीक्षेत असून, याकडे आजवर सर्वच लोकप्रतिनिधींनी कानाडोळा केल्याने पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

समुद्रसपाटीपासून जवळपास ८२७ मीटर उंचीवर असलेल्या या उद्यानात नगरपरिषदेच्या माध्यमातून एकेकाळी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जात होते. याठिकाणी लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी, तसेच अन्य साहित्य उपलब्ध होते. परंतु, मागील काही वर्षांपासून या उद्यानाकडे आजवरच्या सर्वच सत्ताधारी गटाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याने या उद्यानात पर्यटकांची संख्या रोडावली आहे. सायंकाळी थंडगार वातानुकूलित हवा या ठिकाणी अनुभवायला मिळते. या ठिकाणी नीरव शांतता आणि प्रसन्नता असल्याने एका वेगळ्याच दुनियेत असल्याचा भास इथे निर्माण होतो. आजूबाजूला टुमदार बंगले असून, या उद्यानातूनच स्थानिकांसह आजूबाजूच्या हॉटेलमधील पर्यटकांची ये-जा सुरू असते. इथे आकर्षक खेळणी नसल्याने लहान मुलांना या उद्यानाचा आनंद घेता येत नाही. अंतर्गत भागातील दगडगोटे वर आल्याने ठोकर लागून

पर्यटकांमध्ये नाराजीचा सूर

एखाद्याचा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी मुख्य रस्त्याचे जे जुने पेव्हर ब्लॉक काढण्यात आले आहेत, त्यांचा या उद्यानात वापर केल्यास इथल्या मातीची धूप होणार नाही तसेच साफसफाई उत्तम प्रकारे राखण्यासाठी कामगारांना सोयीचे ठरू शकते.

> नगरपरिषदेच्या वतीने पन्नास रुपये प्रवासी कर आकारणी केली जाते. परंतु पर्यटकांना अभिप्रेत सोयीसुविधा इथे दिल्या जात नाहीत. सायंकाळी क्षणभर विश्रांतीसाठी या उद्यानात मुलांसोबत आले तर त्यांना खेळण्यासाठी चांगल्या स्थितीत साहित्य उपलब्ध नाहीत.त्यामुळे जो आनंद मुलांना हवा असतो तो मिळत नाही. तरी याकडे संबंधित खात्याने लक्ष द्यावे.
>
> – पुरुषोत्तम साळवे, पर्यटक, मुंबई (दादर)

मागील काळात मुख्य बाजारपेठेमध्ये असणाऱ्या नवरोजी उद्यानातसुद्धा निकृष्ट दर्जाची खेळणी तसेच साहित्य बसविण्यात आले होते.

त्यामुळे तिथसुद्धा पर्यटकांच्या लहान मुलांना खेळता येत नसल्याने त्यांचा भ्रमनिरास होताना दिसून येत आहे. पेमास्टर उद्यानाची प्रशस्त जागा असल्याने याठिकाणी आकर्षक असे नाविन्यपूर्ण साहित्य आणल्यास पर्यटक मोठ्या प्रमाणावर गर्दी करू शकतात. निदान यापुढे तरी खेळणी अथवा क्रीडा साहित्य मागविताना ती उत्तम दर्जाचे असावीत, अशी मागणी पर्यटक आणि स्थानिकांमधून केली जात आहे.

संविधान उद्देशिकेचे वाटप

। पाली । वार्ताहर ।

पालीतील शिक्षक व संविधान अभ्यासक राजेश गायकवाड यांनी संविधान जनजागृतीचा विधायक संकल्प केला आहे. सलग पाच वर्षांपासून ते विविध ठिकाणी मोफत व्याख्यानाद्वारे संविधान जनजागृती व मार्गदर्शन करत आहेत. याबरोबरच संविधान उद्देशिका फ्रेम भेटदेखील देत आहेत. राजेश गायकवाड हे सुधागड तालुक्यातील कुंभारघर आदिवासीवाडी जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत.

आपल्या व्याख्यानात भारतीय संविधानाचे महत्त्व, मार्गदर्शक तत्त्वे, संविधानाची उपयुक्तता, संविधान उद्देशिकेचे वाचन केले. संविधानातील महत्वाची कलमे, नागरिकांचे मूलभूत हक्क व कर्तव्य यांची माहिती तसेच मुळात संविधानाची गरज का आहे याबाबत सविस्तर विवेचन आणि संविधानविषयी सखोल माहिती देऊन मार्गदर्शन राजेश गायकवाड करतात. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

पर्यटकांचा ताज्या मासळीवर ताव

। पाली । वार्ताहर ।

जिल्ह्याला सध्या समुद्रातील मासेमारी जोरात सुरू आहे. मोठ्या प्रमाणात मासळी सापडत आहे. त्यामुळे मासळीची आवक वाढली आहे. परिणामी मासळीचे भाव आटोक्यात आहेत. त्यामुळे येथे येणारे पर्यटक व खवय्यांची चंगळ झाली आहे.

मोठ्या विश्रांतीनंतर मासळीची चांगली आवक सुरू झाली आहे. त्यामुळे येथे ताजी मासळी सहज उपलब्ध होते. दिवाळीच्या सुट्टीत पर्यटकांची मोठी गर्दी आहे. अनेक लोक व पर्यटक खास ताजी मासळी खाण्यासाठी येथे येतात. तर येथील मासळी मोठ्या प्रमाणात मुंबई व इतर शहरात देखील जाते. कोळंबी, सुरमई, रावस, टोळ, कर्ली, घोळ व पापलेट आदी माशांना पसंती मिळत आहे. बागडा, बोंबील, मांदेली, बांगडा असा माशांची लॉटरी लागत आहे.

मासळी दर प्रतिकिलो (ठिकाणानुसार यामध्ये कमी जास्त भाव आहे) बोंबील - ३०० रुपये पापलेट मध्यम आता ६००, पापलेट मोठे आता १०००, सुरमई ७००, घोळ ८००, रावस ८००, मांदेली १५०, कोलंबी ४००, बांगडा मालवणी ३००, हलवा ५००, टोळ ४००.

> दिवाळी सुट्ट्यांमुळे सध्या पर्यटक मोठ्या प्रमाणात दाखल होत आहेत. तसेच अनेक चाकरमानी गावी आले आहेत. त्यांचा कल मासळी खाण्यावर अधिक आहे. मासळीदेखील मुबलक व ताजी मिळत आहे. खवय्ये खूष आहेत. परिणामी, विक्रीसुद्धा चांगली होत आहे. – गौरी मनोरे, मासळी विक्रेत्या, पाली

> सुट्ट्यांमध्ये समुद्रकिनारी व इतरत्र फिरण्यासाठी सहकुटुंब लोक येत आहेत. येथील मासळी ताजी व किंमत आवाक्यात आहे. त्यामुळे सर्वजण मासळी खाण्याला पसंती देतात.
> – मनीष पाटील, चालक, माऊ रेस्टॉरंट, दिवेआगर

संविधान दिनानिमित्त विविध कार्यक्रम

। पाली-बेणसे । वार्ताहर ।

बोर्लीपंचतन येथील मोहनलाल सोनी विद्यालय व नानासाहेब कुळकर्णी कनिष्ठ महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रम राबविण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर संविधान पुस्तक पूजन, राष्ट्रगीत, संविधान प्रास्ताविक वाचन, पाहुण्यांचे स्वागत, विद्यार्थी भाषण आदी कार्यक्रम घेण्यात आले. त्यानंतर

विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप करण्यात आले. यावेळी जनता शिक्षण संस्था बोर्लीपंचतन विद्यमान सचिव चंद्रकांत धनावडे, खजिनदार निवास गाणेकर, प्राचार्य दिलीप कासारे, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

Sr. No.	Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/	Description	Estimated cost in lakhs	Submission date
1	E-Tender-22/23-24/Rfx No.7000028784	Work of renovation of EROS Make LIFT (manual passenger LIFT-G+2) along with AMC at 400 kV Nagothane s/s under 400 KV R.S. (O&M) Division Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel **2nd Call**	Rs. 3,26,071/-	03.12.2023 up to 23.59 hrs

EMD Rs. 5000/- &Tender fee Rs. 500/- + GSTfor further details visit our website https://srmtender.mahatransco.in/ Contact Person: Mitesh Goyal(DYEE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
EXECUTIVE ENGINEER
400kV R.S. (O&M) Dn. Nagothane

२६/११ हल्यातील शहिदांना मानवंदना

। पाताळगंगा । वार्ताहर ।

संविधान दिनानिमित्त विविध संस्था, संघटना, सरकारी कार्यालये आणि शाळांमध्ये संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी अविनाश कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज तसेच मुंबई येथे झालेल्या २६/११ च्या हल्ल्यात शहीद झालेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी माजगाव सरपंच दिपाली पाटील, ग्रामसेवक संदीप धारणे, मा.सरपंच गोपीनाथ जाधव, आर.पी.आय. रायगड जिल्हा कार्याध्यक्ष अविनाश कांबळे, नरेश पाटील, सदस्या अर्पणा शिंदे, पूनम प्रकाश जाधव, प्रांजळ जाधव, वैशाली महाब्दि, सरिता वाघे, सदस्य शशिकांत पाटील, मधुकर गायकवाड, सम्राट नगर महिला मंडळ आदी उपस्थित होते.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-धामोते ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळत आमचे अशिल सदर मिळकत विकसनासाठी घेण्याचे ठरविले आहे.

मालकांचे नांव	स.नं./प्लॉट नंबर	क्षेत्र चौ.मी	आकार रू.पै.
१)नितीन प्रताप ठक्कर २)भगवानदास विठ्ठलदास माधवाणी	१००/७	३९० चौ.मी	३९.००

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखा स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विकसनाचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ॲड.अशोक पालू डुकरे
रा.प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं.१०१,
ममदापुर रोड, नेरळ ता.कर्जत जि.रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये रणजित प्रभाकर राणे ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशिल हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरूद्ध कोणताही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोट, मुंबई-४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध,दावा, मागणी आणि /किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७(सात) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

अनुसूची
(मालमत्तेचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा व उपजिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-टेकाळी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १०७, एकूण क्षेत्र ०-१२-०० (हे.आर.चौ.मी) आकार ० रू.१९ पै.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २७/११/२०२३

झुंजारराव आणि कं.करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये विजय पद्माकर म्हात्रे ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशिल हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरूद्ध कोणताही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोट, मुंबई-४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध,दावा, मागणी आणि /किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७(सात) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

अनुसूची
(मालमत्तेचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा व उपजिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-टेकाळी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १३३, एकूण क्षेत्र ०-१५-४० (हे.आर.चौ.मी) आकार २ रू.१३ पै.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २७/११/२०२३

झुंजारराव आणि कं.करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

ई-खुली निविदा मागविणारी सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने विभागिय विद्युत अभियंता केआरसीएल, रत्नागिरी, हे खालील कामासाठी ई-खुली निविदा मागवित आहेत. **कामाचे नाव: रत्नागिरी विभागातील विविध ठिकाणी कमीतकमी 3 स्टार दोन/1.5 टन स्प्लिट एसी युनिट्सची तरतूद. (निविदा क्र. केआर/आरएन/ईएल/टी/12/2023 दिनांक: 27/11/2023) अंदाजे मूल्य:** ₹ **11,94,000/-** (जीएसटी वगळता). **निविदा अर्जाचे शुल्क:** शून्य, **इरठे:** ₹ **23,900/-** (किंवा IREPS पोर्टलवर दाखवल्याप्रमाणे). **निविदा ऑन लाईन जमा करण्याचा शेवटचा दिनांक आणि वेळ: 18/12/2023 रोजी 15.00 वा.** पर्यंत. अधिक माहितीसाठी वरिष्ठ क्षेत्रिय विद्युत अभियंता ह्यांचे कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी ह्यांच्याशी संपर्क करा किंवा **(www.ireps.gov.in)** या संकेतस्थळाला भेट द्या:

जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये रणजित प्रभाकर राणे ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशिल हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरूद्ध कोणताही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोट, मुंबई-४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध,दावा, मागणी आणि /किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७(सात) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

अनुसूची
(मालमत्तेचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा व उपजिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-टेकाळी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ९४, एकूण क्षेत्र ०-३१-०० (हे.आर.चौ.मी) आकार ५ रू.५२ पै.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २७/११/२०२३

झुंजारराव आणि कं.करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये रणजित प्रभाकर राणे ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशिल हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरूद्ध कोणताही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोट, मुंबई-४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध,दावा, मागणी आणि /किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७(सात) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

अनुसूची
(मालमत्तेचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा व उपजिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-टेकाळी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १०५, एकूण क्षेत्र ०-१४-०० (हे.आर.चौ.मी) आकार ० रू.२२ पै.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २७/११/२०२३

झुंजारराव आणि कं.करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या बिनशेती मिळकतींचे विद्यमान मालक श्री.रमेश संभाजी मलये, श्री.दत्तात्रेय ज्ञानु माने, श्री.किरण गोंविद ठाकूर, श्री.विजय विष्णु गावकर, श्री.अनंत वामन खाडीलकर, श्री.प्रकाश चिंतामण सुतार, श्री.योगेश वसंत केसरकर, श्री.श्रीकांत नारायण जावळे, श्री.अरविंद वामन रानडे, श्री.सुभाष शंकर कवडे यांचेकडून त्या मिळकतींमध्ये जाणे-येणेकरीता मौजे किहीम नवीन गट क्रमांक १८ (पुर्वाचा गट क्रमांक ४१२) मधील हरिश्चंद्र नारायण पडवळ यांच्या हिश्श्याच्या ०-११-०० हे.आर.क्षेत्रामधून असलेल्या २४६ चौ.मीटर क्षेत्रफळाच्या वहिवाटीच्या रस्त्याच्या हक्कासह यांचेकडून खरेदी घेणेचे ठरविलेले आहे. सदर मिळकतींमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांनी दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे किहीम, ता.अलिबाग जि.रायगड येथील

भूमापन क्रमांक	हिस्सा क्रमांक	क्षेत्र आर.चौ.मी.	आकार रू.पै.
१७	१	२-९१-७५	२९.१७
१७	२	२-८७-७५	२८.७७
१७	३	२-८५-००	२८.५०
१७	४	३-१५-००	३१.५०
१७	५	२-८५-००	२८.५०
१७	६	२-८५-००	२८.५०
१७	७	२-८५-००	२८.५०
१७	८	२-८५-००	२८.५०
१७	९	२-१२-५०	३१.७०
१७	१०	३-०७-५०	३०.७०
१७	११	४-१५-००	४१.५०
१७	१२	७-९६-००	७९.६०

या मिळकतींचे पुर्वीचे वर्णन मौजे किहीम भूमापन क्रमांक ४११, हिस्सा क्रमांक १ ते हिस्सा क्रमांक १२ असे होते. किहीम गावी एकत्रीकरण, योजना लागू होणेपुर्वी या मिळकतीचे वर्णन सर्व्हे क्रमांक ८९, हिस्सा क्रमांक ३ क्षेत्र ०-४१-५ हे.आर.असे होते.

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक : २६/११/२०२३

ॲड. रविंद्र वि.ओक
'गुरूकृपा'
अलिबाग अर्बन बँकेशेजारी
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.अलिबाग,
जि.रायगड

निवडक

गंभीरच्या भूमिकेत राहुल ?

लखनौ : लखनौ सुपर जायंट्सचा मार्गदर्शक गौतम गंभीर अलीकडेच संघ सोडून कोलकाता नाईट रायडर्समध्ये सामील झाला आहे. अशा परिस्थितीत एसएसजीला मार्गदर्शकाची गरज आहे. जे राहुल द्रविड चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकतो. द्रविडकडे प्रदीर्घ प्रशिक्षणाचा अनुभव आहे. ज्यामुळे संघाला खूप मदत होऊ शकते. द्रविड एसएसजीमध्ये सामील होणार की नाही याचा निर्णय बीसीसीआयच्या बैठकीनंतर होणार आहे.

१० संघांमध्ये क्रिकेट महायुद्ध

नवी दिल्ली : जगात सर्वाधिक पाहिली जाणारी टी-२० इंडियन प्रीमियर लीग आहे. आयपीएलमध्ये खेळून खेळाडूंना पैसा आणि प्रसिद्धी दोन्ही मिळते. आयपीएल २०२४ चा लिलाव १९ डिसेंबर रोजी पहिल्यांदाच दुबईत होणार आहे. पण त्याआधी, सर्व संघांना २६ नोव्हेंबरपर्यंत कायम ठेवलेल्या आणि सोडलेल्या खेळाडूंची यादी आयपीएल व्यवस्थापनाकडे सादर केली आहे. आता क्रिकेटच्या चाहत्यांना १० संघांमध्ये क्रिकेटचे महायुद्ध पहावयास मिळणार आहे.

जावेद मनोरे यांचे निधन

वडूज : येथील व्हॉलीबॉलचे नामांकीत आंतरराष्ट्रीय पंच जावेद मनोरे यांचे आज येथे निधन झाले. त्यांच्या मागे आई,वडील,तीन बंधू,बहिण,पत्नी,एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. शुटिंग बॉलचे ते राष्ट्रीय खेळाडू म्हणून परिचीत होते. सलग १५ वर्षे ते महाराष्ट्र राज्य संघाचे पंच म्हणून काम पाहत होते. तसेच महाराष्ट्र संघाचे ते कायम उपकर्णधार होते. व्हॉलीबॉलचे देशपातळीवर नामांकीत खेळाडू म्हणून त्यांची ख्याती होती.

शमीची अपघातग्रस्तांना मदत

नवी दिल्ली : शमी उत्तराखंडच्या नैनीतालकडे निघाला होता. वाटेमध्ये त्याला अपघात झालेली गाडी दिसली. यावेळी शमीने आपली कार थांबवत मित्राच्या मदतीने अपघातग्रस्त गाडीतील लोकांना मदत केली. त्यांची गाडी दरीमध्ये गेली होती. यावेळी त्यांना बाहेर काढण्याचे काम शमी आणि त्याच्या मित्रांनी केले. शमीने याबाबतचा व्हिडिओ समाज माध्यमांवर टाकला आहे. कोणाला तरी वाचवल्याचा मला खूप आनंद होत आहे, असे तो म्हणाला.

अर्शिन भारताच्या संघात

सोलापूर : सोलापूरच्या अर्शिन कुलकर्णीची १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. बीसीसीआयने या संघाची घोषणा केली आहे. ८ ते १७ डिसेंबर दरम्यान ही स्पर्धा दुबई येथे होत आहे. ८ डिसेंबरला भारतीय संघाची लढत अफगाणिस्तान विरुद्ध, १० डिसेंबरला पाकिस्तान विरुद्ध तर १२ डिसेंबरला नेपाळ विरुद्ध होणार आहे. नुकत्याच झालेल्या एमपीएल स्पर्धेत अर्शिनने धडाकेबाज शतक झळकावले होते.

८ ते १७ डिसेंबर दरम्यान आशिया चषक स्पर्धा

भारत-पाक क्रिकेट संघ पुन्हा येणार आमने सामने

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

अलीकडेच २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकामध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना खेळला गेला. त्यानंतर पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानचे क्रिकेट संघ मैदानावर आमनेसामने येणार आहेत. मात्र यावेळी हा सामना वरिष्ठ संघामध्ये नसून कनिष्ठ संघांमध्ये होणार आहे.

भारताचा कनिष्ठ १९ वर्षाखालील संघ ८ डिसेंबर ते १७ डिसेंबर दरम्यान आशिया कप खेळणार आहे. ही स्पर्धा यूएईमध्ये खेळली जाणार आहे. बीसीसीआयने त्यासाठी संघाची घोषणा करताना, संपूर्ण वेळापत्रकही शेअर केले आहे. या स्पर्धेत भारतीय संघ आठ वेळा विजेता ठरला आहे. भारतीय संघ या स्पर्धेत देखील विजेतेपद पटकविणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. या स्पर्धेत एकूण आठ संघ सहभागी होत आहेत. भारताशिवाय पाकिस्तान, अफगाणिस्तान, नेपाळ, यूएई, जपान, श्रीलंका आणि बांगलादेश हे देशही सहभागी होणार आहेत. भारतीय संघ या स्पर्धेतील पहिला सामना ८ डिसेंबर रोजी अफगाणिस्तानविरुद्ध खेळणार आहे. तर भारत आणि पाकिस्तान यांच्यात १० डिसेंबरला सामना रंगणार आहे.

या स्पर्धेत प्रत्येकी चार संघांची दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक संघ साखळी फेरीत तीन सामने खेळणार आहे. यानंतर प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. दोन्ही उपांत्य फेरीचे सामने १५ डिसेंबरला होतील, त्यानंतर अंतिम सामना १७ डिसेंबरला होईल.

१९ वर्षाखालील आशिया कपसाठी भारतीय संघ

अर्शिन कुलकर्णी, आदर्श सिंह, रुद्र पटेल, सचिन धस, प्रियांशू मोलिया, मुशीर खान, उदय सहारन (कर्णधार), अरावेल्ली अवनीश राव, सौम्य कुमार, मुर्गन अभिषेक, इनेश महाजन, धनुष गौड, आराध्या शुक्ला, नमम तिवारी, राज लिंबानी.

भारतीय संघाच्या सामन्यांचे वेळापत्रक

- ८ डिसेंबर भारत विरुद्ध अफगाणिस्तान
- १० डिसेंबर - भारत विरुद्ध पाकिस्तान
- १२ डिसेंबर भारत विरुद्ध नेपाळ
- १५ डिसेंबर - दोन्ही उपांत्य फेरीचे सामने
- १७ डिसेंबर - अंतिम सामना

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित क्रिकेट स्पर्धा

स्पोर्टी-गो क्रिकेट अकॅडमी कळंबोली विजयी

। पोयनाड । प्रतिनिधी ।

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित कै.मिलिंद चवरकर स्मृतीचषक ४० षटकांच्या एकदिवसीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीतील सामन्यात स्पोर्टी-गो क्रिकेट अकॅडमी कळंबोली संघांनी लावास क्रिकेट स्पोर्ट्स पनवेल संघावर विजय मिळवला आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्विकारत स्पोर्टी-गो संघांनी ४० षटकांन मध्ये ८ गडी गमावत २७६ धावा धावफलकावर नोंदवल्या. सलामीचा फलंदाज दिव्यांश चौधरी यांनी ५७ आदर्श सिंग तर अर्णव मिरगे यांनी चौफेर फटकेबाजी करत सर्वाधिक ८७ धावा काढल्या. लावास पनवेल संघाकडून साईश म्हात्रे यांनी ३ व आयुष पाटील यांनी २ फलंदाज बाद केले. पनवेल संघांनी सर्व गडी गमावत ३५ षटकांमध्ये १०६ धावसंख्या उभारली. साईश म्हात्रे यांनी सर्वाधिक २७ धावा काढल्या. स्पोर्टी-गो कडून आदर्श सिंग यांनी ५ व जयेंद्र पावसकर यांनी सुरेख गोलंदाजी करत ४ फलंदाज बाद केले. स्पोर्टी-गो संघांनी सामना १७० धावांनी जिंकला.अष्टपैलू खेळ करणाऱ्या आदर्श सिंग याला सामनावीर, साईश म्हात्रे स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू, उदयोन्मुख खेळाडू अर्णव मिरगे, अनय कांबळे तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून यश देवकर यांना परमेश्वर जाधव, मंगेश कदम, नरेंद्र पावसकर, गौरव कदम, हेमलता सामंत कनिष्का लाखवांनी, संकेश ढोले,आदेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

दीपक चहरने केला पुनरागमनाचा दावा

१० षटकात केले सहा फलंदाज बाद

। राजस्थान । वृत्तसंस्था ।

विजय हजारे ट्रॉफी सध्या भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळली जात आहे. भारतीय खेळाडूंसाठी ही स्पर्धा खूप महत्त्वाची आहे. आयपीएल लिलावापूर्वी अनेक युवा खेळाडू संघांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचवेळी काही खेळाडू भारतीय संघामध्ये पुनरागमन करण्याचा दावा करत आहेत. भारतीय क्रिकेट संघाचा अष्टपैलू खेळाडू दीपक चहर सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. मात्र विजय हजारे करंडक स्पर्धेत राजस्थानकडून खेळताना त्याने चंदीगड येथील शासकीय माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर गुजरातविरुद्ध चमकदार कामगिरी केली आहे.

या सामन्यात उजव्या हाताचा गोलंदाज दीपक चहरने १० षटकात केवळ ४१ धावा देत ६ फलंदाजांना तुबूंचा रस्ता दाखवला. त्याने गुजरातचा सलामीवीर प्रियांक पांचाळला बाद करून सुरुवात केली आणि शेवटी अर्जुन नागासवालाला बाद करत ६ फलंदाज बाद केले . दीपकच्या घातक गोलंदाजीसमोर गुजरातचे फलंदाज टिकू शकले नाहीत आणि संपूर्ण संघ १२८ धावांत गडगडला.दीपक चहरने ७ डिसेंबर रोजी बांगलादेश दौऱ्यावर भारतीय क्रिकेट संघासाठी शेवटचा सामना खेळला. या दौऱ्यात दीपक चहरला दुखापत झाली होती, त्यानंतर त्याला पुन्हा आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्याची संधी मिळाली नाही. त्याच वेळी, त्याने आयपीएल २०२३ मध्ये पुनरागमन केले आणि चेन्नई सुपर किंग्जकडून खेळला. मात्र तो तंदुरुस्त परतला असून संपूर्ण हंगामात तो खेळू शकला नाही.

पेणचा प्रतिश 'महाराष्ट्र श्री'

। पेण । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शरीर सौष्ठव असोसिएशनच्या मान्यतेने कोल्हापुर येथे ६० वी वरिष्ठ महाराष्ट्र श्री २०२३ स्पर्धा पार पडली. पेण तालुक्यातील वरेडी गावचे सुपुत्र प्रतिश पांडुरंग पाटील याने ८५ वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवत महाराष्ट्र श्री २०२३ हा किताब पटकावला. स्पर्धेमध्ये राज्यभरातून मोठ्या संख्येने स्पर्धक आले होते. प्रतिशच्या कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. भविष्यात शरीर सौष्ठव स्पर्धेमध्ये देशाचे प्रतिनिधीत्व करण्याचे त्याची इच्छा आहे.

डॅरेन ब्राव्होचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा

। वेस्ट इंडिज । वृत्तसंस्था ।

इंग्लंड क्रिकेट संघ पुढील महिन्यात वेस्ट इंडिज दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात वेस्ट इंडिज विरुद्ध इंग्लंड संघात ३ एकदिवसीय आणि ५ आंतरराष्ट्रीय टी२० सामने खेळले जाणार आहेत. या दौऱ्याला ३ डिसेंबरपासून एकदिवसीय मालिकेने सुरुवात होणार आहे. या मालिकेसाठी वेस्ट इंडीज संघात संधी न मिळालेला अनुभवी फलंदाज डॅरेन ब्राव्हो याने आपल्या निवृत्तीची घोषणा केली आहे.

वेस्ट इंडीज क्रिकेट मंडळ खराब अवस्थेतून जात असताना संघात काही अनुभवी खेळाडूंचे पुनरागमन होऊ शकते असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, ब्राव्हो याला संधी मिळाली नाही. त्यामुळे त्याने निवृत्तीचा निर्णय घेतला. सोशल मीडियाद्वारे एक पोस्ट लिहित त्याने हा आपला निर्णय सार्वजनिक केला. आपल्याला सातत्याने डावले जात असल्यामुळे आपण हा निर्णय घेत असल्याचे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. आपल्या १४ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकीर्दीत त्याने ५६ कसोटी, १२२ वनडे व २६ टी २० सामने खेळले. यामध्ये त्याने सात हजार पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. ब्राव्हो आता जगभरात टी२० क्रिकेट खेळताना दिसेल.

विश्वचषक गमावला पण विक्रमी प्रेक्षकसंख्या कमावली

भारतात ४२२ अब्ज मिनिटे पाहिला गेला टीव्ही

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतातील २०२३ च्या पुरुषांच्या एकदिवसीय विश्वचषकाने स्टेडियममधील उपस्थिती आणि प्रसारण दर्शकांचे विक्रम मोडीत काढले आहेत. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये २०१५ च्या विश्वचषकादरम्यान १,०१६,४२० प्रेक्षकांच्या मागील विक्रमाला मागे टाकून भारतातील मैदानांवर एकूण १,२५०,३०७ प्रेक्षकांनी ४८ सामने पाहिले, असे आयसीसीने म्हटले आहे. इंग्लंडमधील २०१९ विश्वचषक ७,५२,००० प्रेक्षकांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे.

डिस्ने स्टारने सांगितले की, भारतातील लीनियर टेलिव्हिजन प्रेक्षकसंख्या ५० कोटींहुन अधिक झाली असून, स्पर्धेच्या सहा आठवड्यांमध्ये विश्वचषकासाठी ५१८ चाहत्यांनी स्पर्धेतील सामन्यांचा आनंद लुटला.भारतातील ब्रॉडकास्ट ऑडियंस रिसर्च कौन्सिलच्या आकडेवारीनुसार ४२२ अब्ज मिनिटं इतका कालावधी प्रेक्षकांनी विश्वचषकाचे सामने पाहिले आहेत, ज्यामुळे हा आतापर्यंतचा सर्वात मोठा विश्वविक्रम बनला आहे. भारत ऑस्ट्रेलिया सामना ३० कोटी चाहत्यांनी पाहिला. सामन्यादरम्यान एकाक्षणी १३ कोटी चाहते अंतिम लढत पाहत होते.

टीव्हीवर सर्वाधिक पाहिला गेलेला क्रिकेट सामना असं डिस्ने स्टारने भारत-ऑस्ट्रेलिया लढतीच्या प्रेक्षकसंख्येबाबत म्हटलं आहे. डिस्ने हॉटस्टार अर्थात ओटीटी प्लॅटफॉर्मवरही विश्वचषकाने नवे विक्रम प्रस्थापित केले. हॉटस्टारवर ५९ दशलक्ष चाहत्यांनी विश्वचषक पाहणे पसंत केले.

'ऑलिम्पिक कोटा' मिळविणाऱ्या

कुस्तीगिरांनाही चाचणी अनिवार्य!

। पुणे । वृत्तसंस्था ।

जागतिक संघटनेकडून बंदी घालण्यात आलेल्या भारतीय कुस्ती महासंघाचे कामकाज पाहणाऱ्या हंगामी समितीने आश्चर्यकारक निर्णय घेण्याची प्रथा कायम ठेवली आहे. २०२४च्या पॅरिस ऑलिम्पिकचा कोटा मिळवणाऱ्या कुस्तीगिरांनाही या स्पर्धेसाठी भारताच्या संघात थेट स्थान मिळणार नाही. त्यांनाही पात्रता सिद्ध करण्यासाठी निवड चाचणीत खेळणे अनिवार्य करण्याचा निर्णय हंगामी समितीकडून घेतला आहे.

हंगामी समिती सुरुवातीला आव्हानवीरांची निवड करणार आहे. समितीने निश्चित केलेल्या आव्हानवीरांशी देशाला ऑलिम्पिक कोटा मिळवून दिलेले मल्ल १ जून २०२४ रोजी खेळतील आणि या लढतीतील विजेता मल्ल ऑलिम्पिकसाठी जाईल. आतापर्यंत देशाला ऑलिम्पिक कोटा मिळवून देणारा मल्लच ऑलिम्पिकमध्ये खेळला आहे. हंगामी समिती आता वेगळ्या हुकूमशाहीने वागत असल्याची चर्चा कुस्ती क्षेत्रात सुरू आहे.

विशेष म्हणजे आतापर्यंत भारताला केवळ महिला कुस्तीगीर अंतिम पंघालने (५३ किलो) ऑलिम्पिक कोटा मिळवून दिला आहे. अजून १७ मल्लांना पात्रता सिद्ध करायची आहे. त्यांना आशियाई ऑलिम्पिक पात्रता १९ ते २१ एप्रिल २०२४ या कालावधीत किर्गिस्तान, तर जागतिक ऑलिम्पिक पात्रता ९ ते १२ मे २०२४ या कालावधीत तुर्की येथे होणाऱ्या स्पर्धेत ही संधी मिळणार आहे. या पात्रता फेरी झाल्यानंतर देशाला ऑलिम्पिक कोटा मिळवून दिलेल्या मल्लांचे आव्हानवीर हंगामी समिती ३१ मे रोजी जाहीर करेल आणि मग त्यांच्यात १ जूनला लढत होईल.

भारतीय संघ जाणार दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर

वरिष्ठ खेळाडूंना मिळणार सरावाची पूर्ण संधी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलियाविरुद्ध मायदेशातील ५ सामन्यांची टी-२० मालिका संपल्यानंतर भारतीय संघ दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी रवाना होणार आहे. येथे त्यांना तीन टी-२०, तीन एकदिवसीय आणि दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळायची आहे.

कसोटी मालिकेचे महत्त्व लक्षात घेऊन भारतीय क्रिकेट नियामक मंडळ तीन चार दिवसीय सराव सामन्यांचे नियोजन करत आहे, जेणेकरून भारताचे वरिष्ठ खेळाडू मालिका सुरू होण्यापूर्वी परिस्थितीशी पूर्णपणे जुळवून घेऊ शकतील. भारतीय संघातील काही वरिष्ठ खेळाडू, जे सध्या कसोटी संघाबाहेर आहेत, ते देखील त्यांच्या पुनरागमनासाठी उत्सुक आहेत, ज्यामध्ये त्यांना या सराव सामन्यांमध्ये खेळण्याची संधी देखील मिळू शकते जेणेकरून ते स्वतःला सिद्ध करू शकतील.

अजिंक्य रहाणे आणि पुजाराच्या पुनरागमनाकडे सर्वांचे लक्ष

भारताला दक्षिण आफ्रिकेत एकदाही कसोटी मालिका जिंकण्यात यश आलेले नाही. अशा स्थितीत हा दौरा संघासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. दरम्यान, कसोटी संघाच्या घोषणेवरही सर्वांच्या नजरा लागून आहेत.विशेषतः चेतेश्वर पुजारा आणि अजिंक्य रहाणे यांचा संघात समावेश होतो का याकडे विशेष लक्ष असेल. गेल्या वर्षभरात दोघांची कामगिरी काही विशेष झालेली नाही. त्याचबरोबर उपेंद्र यादव आणि सौरभ कुमार अशी काही नवीन नावेही संघात पहायला मिळू शकतात, जे देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने चमकदार कामगिरी करत आहेत.

दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी भारतीय संघाचीही लवकरच घोषणा होऊ शकते. देशांतर्गत क्रिकेटमध्ये गेल्या काही काळापासून सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या संघात काही नवीन नावेही पाहायला मिळतील. बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले की, होय, पुढील महिन्यात भारत 'अ'आणि दक्षिण आफ्रिका 'अ' यांच्यात तीन चार दिवसीय कसोटी सामने होणार आहेत. त्यासाठीचा संघ काही दिवसांत जाहीर केला जाईल. मुख्य संघाच्या सेंच्युरियन (२६ ते ३० डिसेंबर) आणि केपटाऊन (३ ते ७ जानेवारी) येथे होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांपूर्वी, काही वरिष्ठ खेळाडूंसह सातत्यपूर्ण कामगिरी करणारे बहुतांश युवा खेळाडूही तेथे उपस्थित असतील.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)